# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १३२**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष नववे / अंक ९ / ऑगस्ट २००८

## संपादकीय

## ... तर ती सुदिन ठरेल !!

कोणतीही व्यक्ती दुसऱ्याशी वागत असताना जी कृती करते, त्या कृतीमागे असलेल्या तत्त्वाला 'मूल्य' म्हणतात. व्यक्तिगत तसेच सामाजिक स्वरूपाचे जे वर्तन असते, त्यात अशा मूल्यांची व्यवस्था कशी आहे यावर त्या त्या समाजाचे आरोग्य अवलंबून असते. म्हणजेच समाजस्वास्थ्यासाठी मूल्यव्यवस्था निरोगी असणे महत्त्वाचे ठरते. ही मूल्यव्यवस्था नीट राखायची असेल तर समाजधारणेत मूठभरांनी चांगले वागून भागणार नाही, तर प्रत्येकच व्यक्तीकडून सद्वर्तन आणि जबाबदारीची वर्तनशैली अपेक्षित आहे.

'मूल्य व्यवस्था ढासळत आहे' किंवा 'मूल्यांची काही कदरच राहिलेली नाही' असे निरीक्षण आपण जेव्हा नोंदतो, तेव्हा त्यामागे अनेक गुंतागुंतीची कारणे असतात. या कारणांमधील जी प्रमुख कारणे आहेत, त्यांत जगभरच आपल्या जबाबदाऱ्या न ओळखता माणसे वागताहेत हे एक कारण आहे. वसाहतवाद, हुकूमशाही राजवटी इत्यादींचा शेवट होऊन गेल्या शतकांत अनेक देश स्वतंत्र झाले हा इतिहास आपण जाणतोच. पण 'स्वातंत्र्य' याचा अर्थ 'अधिक जबाबदारी' हा फार कमी देशांना समजला. बाकीच्या देशांत, 'स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार' असाच अर्थ दुर्दैवाने अमलात आणला गेलेला दिसतो. हे जाणूनबुजून झाले नसेलही, पण घडले आहे, घडत आहे हे वास्तव आहे. या स्वैराचाराचे जे अनेक दुष्परिणाम जगभर दिसत आहेत, त्या दुष्परिणामांमधील एक म्हणजे, सामाजिक प्रश्नांच्या झळा हा होय!

धर्म विचारांमध्ये जीवनपद्धती, जीवनातील आचार, विचार यांना अतिशय महत्त्व होते; किंबहुना आचार, विचार आणि जीवनपद्धतीवरून धर्म जाणला जाई. परंतु पश्चिमेकडील देशांमधील चुकीच्या जीवनपद्धतींचे आदर्श गिरवायला सुरुवात झाली, अंधानुकरणाला फार मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आणि स्वैराचाराचे मार्ग महामार्ग बनत गेले. तरीही जगभरच 'माणूस म्हणून आपण श्रेष्ठ आहोत' याचा टेंभा मिरवणे चालू असते, जनावरांपेक्षा हीन पातळीवरील जीवनाचा स्वीकार करूनही माणसे स्वतःला श्रेष्ठ मानत राहतात.

माणसाच्या या ताळतंत्र सोडून वागण्याच्या जीवनपद्धतीमुळे मानवी समाजाची मूल्यव्यवस्था उखणली जात आहे.

(पृष्ठ क्रमांक ४० वर)

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

**विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था**

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)

२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)

४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)

५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

७) वि. प्र. मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान संस्था

११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

**उपक्रम**

- भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला
- दशा व्यासपीठ
- डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान
- विद्या प्रसारक मंडळ - वर्धापनदिन
- नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन
- ५ सप्टेंबर - दिक्षान्त समारंभ




**वर्ष नववे / अंक ९ / ऑगस्ट २००८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १३ वे / अंक २ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ग्रंथसामर्थ्य | डॉ. प्रदिप कर्णिक | ३ |
| २) | २५ वर्षांची गौरवशाली वाटचाल - एक सिंहावलोकन | श्री. श्री. वि. करंदीकर | ११ |
| ३) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १५ |
| ४) | इस्पितळाचा पहिलाच अनुभव | श्रीमती निर्मला धारवाडकर | २० |
| ५) | संत सेना महाराज चरित्र | श्री. शं. बा. मठ | २२ |
| ६) | गोवा सहलीचा बेत | श्री. अनिल हजारे | २६ |
| ७) | ओ पी नैय्यर आणि मी | प्रा. मोहन पाठक | २८ |
| ८) | देव देहीच पाहावा | श्री. यशवंत माने | ३२ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# ग्रंथसामर्थ्य

*डिंपल प्रकाशनातर्फे प्रकाशित होणाऱ्या आगामी 'ग्रंथसामर्थ्य' या ग्रंथातील एक प्रकरण येथे देत आहोत. आपल्या व्यक्तिमतत्त्वाची दिशा बदलून टाकणारी ग्रंथांची अलौकिक शक्ती या लेखात जाणवते - संपादक*

माणसाला आपलं भविष्य ज्ञात नसतं हेच उत्तम. पण जे होतं, घडून येतं ते तसंच होणार असतं म्हणून होतं की, कोणी अज्ञात शक्ती, ते घडावं असंच योजून ठेवते? घडलेल्या गोष्टींचा विचार करायला लागलो की, लक्षात येतं की अनेक, अनेकच का, सर्वच घटनांचे धागेदोरे खूप दूर, खूप खूप मागेच सुरू झालेले असतात आणि घटना केवळ घडत जातात. आपण मात्र आश्चर्याने थक्क होतो. हे असं असं आता घडतंय त्यांचा संबंध कितीतरी जुनाच आहे, पण तो आपल्याला मात्र तेव्हा समजला नव्हता, हेच खरं.

मराठी संतवाङ्मयाच्या प्रातांत मी शिरेन असं मला चुकूनही वाटलं नव्हतं. मग मी 'मराठी संशोधन मंडळा'त नोकरी का पत्करली? का पत्करली, याचं उत्तर अगदी सोपं आहे. नोकरी हवी होती, पण ती वाङ्मयाशी संबंधितच हवी होती. हे खरं, पण मग संशोधन मंडळच का? अन्य कुठली संस्था आयुष्यात का आली नाही? हीच का?



त्या संस्थेतला पहिला दिवस आठवतोय. प्रा. तेंडुलकर सर म्हणाले होते, ''इथे प्राचीन, जुन्या वाङ्मयाचं संशोधन होत असतं. तू आठ दिवस काम कर, आवडलं तर सांग, नाही आवडलं तर तसंही सांग.'' मला ते काम आवडलं. मी तिथे रमलो, अगदी रमूनच गेलो. पण म्हणून मला संत वाङ्मयाबद्दल प्रेम निर्माण झालं का? तिथे मला आवडलं होतं असं काय होतं? पाठभेदचिकित्सा, मराठी संशोधनप्रत्रिकेचे प्रकाशन, इतर प्रकाशनांचे कार्य, मुद्रणालयात जाणं, पदकोशादि कार्य, की हस्तलिखितांची बृहन्नामावळी? यातील नेमकं कोणतं काम मला आवडलं होतं? की हे सर्वच आवडलं होतं? हे सर्वच आवडलं होतं, पण त्याचा ज्या वाङ्मयाशी संबंध होता ते प्राचीन मराठी संतवाङ्मय आवडलं होतं का? त्याचं खरंखुरं उत्तर आहे, ते मला फारसं आवडलं नव्हतं. माझं वाचन, माझी पुस्तकं आधुनिक वाङ्मयाशीच नाळ जुळवून होती. तेच माझं आनंदाचं निधान होतं.

बी.ए. ला मी मराठी विषय घेतला होता. एम.ए. ला सुद्धा मराठीच विषय होता. त्यात ज्ञानेश्वरीचा एक अध्याय व तुकारामांचे तीनशे अभंग होते. गुणही बरे मिळाले. याच एम.ए. च्या काळात संशोधन मंडळात असूनही, मी काही त्या वाङ्मयाच्या प्रेमात पडलो नाही. परीक्षार्थीच राहिलो आणि होतोही. ही गोष्ट १९८० ते १९८२ मधली. नंतरच्या काळात ग्रंथालयशास्त्राची पदवी घेऊन मी महाविद्यालयीन ग्रंथपाल झालो. संशोधन मंडळ ते ग्रंथपाल, या कामाच्या दरम्यान मी लोकसत्ता दैनिकातही लागलो होतो. वस्तुत: वाङ्मयाशीच संबंधित नोकरी मला हवी होती व चांगला पगार, संस्था मिळूनही, मी ती नोकरी सोडली व ग्रंथपाल झालो.

तसं पहाता, पत्रकारितेचं वलय, ग्लॅमर कोणालाही आकर्षित करेल असंच आहे, पण मला त्याचा मोह पडला नाही. मला मोह पडला नाही, हे ही बरोबर नाही. वृत्तपत्रादी

कार्यापेक्षाही मला पुस्तकांची ओढ अधिक होती. का? माहीत नाही! पण याच पुस्तकांच्या सान्निध्यात राहायला मिळावे म्हणून मी ग्रंथपालन कोर्स शिकलो. आणि त्याच व्यवसायातली एक संधी आली. कमी पगाराचे ग्रंथालय क्षेत्र व पुस्तके की, चांगला पगार व पत्रकारिता? असा पेच पडला. हा पेच सोडवला तेंडुलकर सरांनी. ते म्हणाले, ''आत्ताच निर्णय घेता येईल. सोडायचेच असेल तर आत्ताच सोड. ग्रंथपालनाचे क्षेत्रही सुरेख आहे.'' मी मग ग्रंथपाल झालो. ग्रंथालय क्षेत्रात येण्यासाठी व तो पेच सोडवण्यासाठी तेंडुलकर तिथे केवळ माझ्यासाठी होते का? त्यांची इतरही कार्ये होतीच, पण त्यातील त्यांना नेमून दिलेले त्यांचे एक कार्य हे ही होते का की, मला ग्रंथालयक्षेत्रात येण्यासाठी ते निमित्त व्हावेत. हे निमित्त व्हावे, याचसाठी मी संशोधन मंडळात होतो का? संतवाङ्मयापासून हजारो कोस दूर असूनही?

आपल्या आयुष्यात काही माणसे येतात, काही अजिबात येत नाहीत, असं का? जी येतात, त्यातली काहीच आपल्या पुढील घटनांना निमित्त ठरतात. बाकीची येतात नि जातात. घटना घडतात व संपतात. दीर्घकालीन प्रवासाच्या घटनांना निमित्त होणारी माणसे, ज्याच्या त्याच्या आयुष्यात येणे, हे एक नियोजन असते का? की ते घडते म्हणून घडते?

माझ्या आयुष्यात पुस्तकं येणं किंवा मी पुस्तकं आणि केवळ पुस्तकंच करीत राहाणं. अथवा तोच पोटापाण्याचा व्यवसाय निवडणं, यामागे कोणती घटना? कोणती व्यक्ती? माझा मामा, माझा मोठा भाऊ असे काही आहेतच, पण वाङ्मयाबद्दलची इतकी परकोटीची भक्ती, पुस्तकांवरचे निरतिशय प्रेम, माझ्यात ओतणारी वा निमित्त ठरणारी व्यक्ती आठवत नाही. हे विधिलिखितच होते का? हीच माझी नियती होती का? दैव होते का?

'वाङ्मय, लेखन हा माझा श्वास आहे' असं मी एका मुलाखतीत म्हटलं होतं. श्वास तर जन्माला येताच माणसाला येऊन चिकटतो. लेखन, वाङ्मयप्रेम उशीरा लागलं. पण श्वासाप्रमाणे, करतोय, होतोय, असं जाणवतच नव्हतं. ते होतंच गेलं. संधी मिळत गेली. लेख येत गेले. त्यांची पुस्तकंही प्रकाशित झाली. पण सारा मामला, रोख आधुनिक वाङ्मयाशीच होता. 'जेथे जातो तेथे मी माझा सांगाती' असे सांगणारे मर्ढेकर तुकारामांपेक्षा जवळचे वाटत होते. 'सद्गुरूवाचोनि सापडावी सोय' म्हणणारे विंदाच पटत होते. त्या दोन महान कवींचे एक ठीक होते, पण माझे काय? मी मात्र त्यांच्या सर्टिफिकेटवर माझ्यातला अहंकारच वाढवत नव्हतो काय? अश्रद्धेलाही अशी आंधळी प्रमाणपत्रेच हवी असतात का? जशी ती श्रद्धावालेही जमा करीत असतात! माणसाचं असंच असतं का? महनीय कर्तृत्व नसलं की, त्याला दुसऱ्यांचीच प्रमाणपत्रे, आपलीच वाटायला लागतात. त्यावरच तो उड्या मारतो. अहंकारी होतो. अनुभवशून्य असूनही, बिनदिक्कत विधाने करतो, पुराव्यावाचूनच तो वादही घालतो, इतरांवर, इतरांच्या अनुभवांवर भिस्त ठेवून. त्याचं असं काय असतं?

लिहिलं पण गवसलं का काही? पुस्तकं आली पण त्यानं समाधानी तृप्ती लाभली का काही? लिहिण्यातून आनंद सापडलाच नाही. नेहमीच अतृप्ती, असामाधान. कल्पनांवर कल्पनांची रास मनातल्या मनात फुटत राहिली. मग इथून तिथे, तिथून इथे. कोणताच संकल्प तडीस न जाणारा. त्यातून येणारं नैराश्य, दुःख आणि सततची टोचणी. लेखन हा श्वास असेल, तर मग, त्यातून आनंद का नाही? समाधान, तृप्ती का नाही? काय लिहिलं गेलं, म्हणजे, कृतकृत्यता वाटेल? काय निर्माण केलं की, आत्मा शांत होईल? कविता? नाटक? कादंबरी? काय, नेमकं काय? कविता तर केव्हाच मागे पडली. जमलीच नाही भट्टी. मग कादंबरी? सापडतच नव्हतं आणि वखवख तर संपतच नव्हती. हे असं का? वांझोटी प्रज्ञा हाच तर शाप नाही ना? फुटून यावं असं वाटत होतं आणि फुटत मात्र नव्हतं बरंच

काही.

पुस्तकांचं सान्निध्य मात्र तसं नव्हतं. तहान भूक विसरली जात असे. पुस्तकात डोकं खुपसलं की जगाचं काय वाट्टेल ते होवो. पण पुस्तक संपल्यावर, पुन्हा रुखरुख. पुन्हा नैराश्य. असं आणि इतकं चांगलं कसं जमेल आपल्याला, हीच विंवचना.

पुस्तकं वाचनात आली. विकत घेतली. स्वत:साठी काही आणि ग्रंथालयासाठी भरपूर. त्यात संतवाङ्मयही होतं, पण कधी वाटेला नाही जावंसं वाटलं. म. वा. धोंड वगैरे वाचले. पण ते त्यांच्या शैली करता, ज्ञानेश्वरांसाठी नाही. पण एक दिवस ध्यानीमनी नसताना मराठी संतवाङ्मयाचा चहाताच झालो. का? पुन्हा नियत कार्यच का? जाण्या-येण्याचा, रेल्वेच्या प्रवासाचा, गर्दी, धक्का बुक्का यांचा त्रास होतो म्हणून आणि वाचन-लेखनाला, विशेषत: संकल्पांना वेळ मिळत नाही, प्रवासातच जातो, म्हणून मी रुपारेल कॉलेज सोडून, ठाण्याच्या महाविद्यालयात यायला निघालो होतो. तसे झाले असते, तर पुढे जी पुस्तके आयुष्यात आली, ज्यांनी माझी दिशाच बदलवून टाकली, ती आली असती का? ही पुस्तके आयुष्यात येणार होती, माझ्यावर त्यांचे सामर्थ्य बिंबवणार होती, म्हणूनच मी ती नोकरी सोडली नाही का? नोकरी न सोडण्याचे कारण वेगळे होते, पण नियत कार्य वेगळेच ठरवले होते का, कुणीतरी माझ्यासाठी?

एक दिवस माझे स्नेही प्रा. राजाध्यक्ष माझ्याकडे आले आणि म्हणाले, ''माझ्या परिचयाचे एक वाळिंबे नावाचे गृहस्थ येतील. त्यांना काही पुस्तकं आपल्या ग्रंथालयासाठी दाखवायची आहेत. तुम्ही पहा, आवडली तर घ्या.'' मी होकार दिला. 'येऊ देत त्यांना' असंही सांगितलं. राजाध्यक्षांनी मला, एका माझ्या महत्त्वाच्या प्रसंगी, स्वत: येऊन मदत केली होती. त्याचाही परिणाम माझ्या 'येऊ देत त्यांना' मध्ये होता का? होताच होता. मग खूप वर्षांपूर्वी मला नेमक्या अडचणीच्या वेळी मदत करणारे राजाध्यक्षच का होते? जी पुस्तकं माझ्या आयुष्यात यायची होती, ती मी माझ्या अहंकारी, आधुनिक वाङ्मयाच्या प्रेमापोटी, नाही म्हणू नये म्हणून.

ठरल्याप्रमाणे वाळिंबे आले. त्यांनी पुस्तकं दाखवली. ज्ञानेश्वरीवरील पुस्तके होती. ते त्यांच्या संप्रदायाची माहिती भरभरून देत होते. श्री. मामांची थोरवी सांगत होते. ते नाव, तो संप्रदाय तर मी ऐकलाच नव्हता. संत, बुवा, गुरू, सद्गुरू तर माझ्यासाठी नव्हतेच कुणी जणू. राजाध्यक्षांचे परिचित, त्यामुळे जरा प्रेमानेच गप्पा झाल्या इतकेच. पुस्तके प्रथमदर्शनी चांगलीच वाटली होती, पण 'हेड'ना दाखवतो व मग सांगतो' असं सांगून ठेवून घेतली. जाताना ते म्हणाले, ''तुम्हीही वाचा, तुम्हाला आवडतील.'' का म्हणाले असं? माहीत नाही. पण मी सांगितले, ''नाही, सध्या पी.एच.डी. चालू आहे. सध्या अन्य वाचन बंद आहे.''

''नंतर वाचा.'' म्हणाले.

काही दिवसांनी ते आले. निवडलेल्या पुस्तकांची बिलं केली. काही पुस्तकं परत घेतली. पुढे ते येत राहिले व कशी माहीत नाही, मैत्री जुळत गेली.

अशाच गप्पा मारताना ते म्हणाले, 'अहो, मी दोन वर्षे ठरवतो आहे, रुपारेलला यायचे, पण ओळख नसल्याने परत फिरत असे. शेवटी राजाध्यक्ष सर भेटले व योग जुळून आला. तुम्ही वाचलीत की नाही पुस्तकं!''

प्रत्येक भेटीत तीच विचारणा आणि माझे तेच उत्तर. एक दिवस पी.एच.डी. च्या कामाने कातावून गेलो. सगळं बाड उचलावं आणि नेऊन समुद्रात बुडवून टाकावं, अशा टोकाच्या मन:स्थितीत आलो. म्हटलं, हे काही खरं नाही राजा. जरा यातून बाहेर ये. शांत हो. मग पुन्हा हात घाल कामाला. बाहेर येण्यासाठी वाळिंबेंनी दिलेली पुस्तकं काढली आणि त्यातलं एक छोटं पुस्तक घेतलं वाचायला. पुस्तक होतं श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या 'पैल तो गे काऊ




कोकताहे' या आच्या निरूपणाचं. पुस्तक घेऊन घरी आलो. जेवणखाण झाल्यावर रात्री वाचायला बसलो. वाचत गेलो. वाचत गेलो आणि पुस्तक संपवलं तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते.

एक विलक्षण ज्ञानसंकीर्तनाची समाधी अनुभवली. मनाला कावळ्याचा रूपक कसे श्री ज्ञानदेवांनी केले आहे ते वाचून थरारून गेलो. मनात काहीतरी शिरतंय, उतरतंय आणि पुस्तक बाजूला तर सोडाच, पण कुठल्याही कारणासाठी उठूही नये, असं वाटत होतं आणि उठलोही नाही.

खरं तर माझ्या स्मशान वैराग्याच्या भूमिकेतून मी त्या तीन-चार तासात बाहेरही आलो होतो. आता खरं तर मी माझ्या पी.एच.डी. च्या कामासाठी सरसरून पुढे यायला हवे होते. आलोही, पण एका बाजूला ते विवेचन, ती शैली, ते शब्द, श्रीज्ञानदेवांची अदाकरी ओढून घेत होती. एक झपाटलेपण येऊन चिकटले होते. रोज नव्या अभंगाचे निरुपणाचे पुस्तक आणायचे, रात्र-रात्र जागून वाचायचे. पी.एच.डी. चे काम राहिले बाजूलाच. 'मुंगी उडाली आकाशी', 'माझे माहेर पंढरी', 'ओंकार स्वरूपा सद्गुरू समर्था', 'वारियाने कुंडळ हाले' अशा अनेक अभंगांवरची छोटी छोटी पुस्तके वाचत सुटलो. पुढे एका आणखी मोठ्या पुस्तकावर झडप घातली. श्रीज्ञानदेवांच्या पसायदानावरच्या 'हा होईल दान पसावो' हा ५५० ते ६०० पृष्ठांचा ग्रंथ असाच, रात्र-रात्र जागून वाचून काढला आणि मी या पुस्तकांत अडकतच गेलो. सुदैवाने पी.एच.डी. ची नाळही पुन्हा जुळली. सूर गवसला. एका बाजूला ग्रंथालयशास्त्राचे शास्त्रीय लेखन व दुसऱ्या बाजूला संतवाङ्मयाचे विवेचन, असा काहीसा अनोखा मेळ सुरू झाला होता. रजा घेतलेली असल्याने, दोन्ही बाजू शक्यही होत गेल्या

पुस्तकं वाचीत होतो, पण संप्रदाय, श्री. मामा, श्री. दादा, सौ. ताई यांची नावंही माहीत नव्हती. त्यांचे कार्य तर पूर्णपणे अज्ञात होते. श्री. मामांचे सद्गुरू श्री. गुळवणी महाराज यांचे नाव केवळ ऐकून होतो. श्री. वासुदेवानंद सरस्वती टेंब्येस्वामी महाराजांचेही नावच ऐकले होते. अध्यात्मिक, पारमार्थिक, तत्त्वज्ञानपर विचारांची पाटी पूर्ण तर कोरी होतीच, परंतु तशा पाटीची जीवनात काही आवश्यकता आहे, असंही वाटत नव्हतं. मग इतकी ओढ या पुस्तकांनी का लावली? कशी लावली?

मिळवून, मिळवून पुस्तकं गोळा केली. वाचतच राहिलो. काहीतरी अद्भूत, दिव्य, मंत्रमय वाटत होतं. खेचून घेण्याची एक विलक्षण ताकद, जादू, ओढ, या पुस्तकांतून माझ्यापर्यंत येत होती.

पुस्तकांवर अलोट प्रेम असणाऱ्या मला पूर्वीच्या अनेक पुस्तकांची स्पंदनं पुढे पुढे लक्षात यायला लागली होती. काही पुस्तकं त्रास देत. मनाचा उद्रेक वाढवत. विचारांची आर्वतनं वाढत आणि उलट-सुलट विचारांनी मन सैराट धावे. हे असे का, हे त्यावेळी समजत नसे, पण नंतर नंतर लक्षात यायला लागले, की जे काही आपण वाचतो, ते शब्द, त्यांचा अर्थ व मुख्य म्हणजे त्यांतला

विचार आतून ढवळून काढीत असतो आणि तीच आंदोलने तुमची वैचारिक शक्तीही चक्रावून टाकतात. सकाळीच हातात घेतलेल्या वर्तमानपत्रांनी माझा कित्येकदा, दिवसाच्या दिवस उद्रेकात गेलेला आहे. अन्याय, ससेहोलपट, दुबळेपणा, मस्तवालपणा, रानटी पशुपणा, हुकमत, सत्तेची संपत्तीची मगरूरी, खून, मारामाऱ्या, बलात्कार, शासनाचा बोटचेपणा, पोलिसांची बघेगिरी, भ्रष्टाचार असे, तेच ते वाचून मनात, क्रोध, चीड, संताप, जळफळाट, यांचा स्फोट घडे. त्यातच अवती-भवतीची माणसे, त्यांचे हेवेदावे, राजकारण, स्वार्थी-मतलबीपणा यांची भरच पडत असे. सर्वांची मिळून एक मालिकाच्या मालिका मनात आणि शरीरात उंच-सखल धावत राही. नको ते वाचन, आणि नको तो त्रास, अशी एक शिसारी उत्पन्न करणारी अवस्थाही, वाचनसाहित्याच्या स्पंदनांतून जाणवत राही. पुस्तकांना स्पंदने असतात, जिवंत माणसांच्या वागण्या-बोलण्यात, क्रिया-प्रतिक्रियांत, हावभावात तर ती अधिकाधिकच उमटत राहतात.

माणसाचं मन शांत, क्रोध-राग-लोभ-मोह-मत्सर-दंभ विरहित कसं रहातं, राहू शकतं? काय केलं की हेच मन शांत होईल? विचारांचे थवेच्या थवे थोपवायचे कसे? विवेक नावाची Rational thinking ची पद्धत काय? आपले आपणच विवेकवादी होऊ शकतो का? विवेकवादी होणं आणि विवेक अंगी बाणवणं या भिन्नच बाबी ठरत राहतात. त्यासाठी काय करायचं? त्यासाठी REBT (Rational Emotive Behaviourial Therapy) चा कोर्सही केला. फारच चांगली मांडणी वाटली. स्वत:च्या मनसंवादाचा (Self Talk) गाभाच तिथे सापडला. आपण आपल्याशीच किती संवाद करीत असतो? (खरं तर याला 'संवाद' का म्हणायचे? हा तर 'वादच' असतो. Self Talk चं खरं भाषांतर 'स्व-बोल' असंच असायला हवं. नाहीतरी आपण स्वत:ला आणि इतरांना 'बोल'च लावत नाही कां, त्या मनातल्या मनात होणाऱ्या बोलण्याला?) कसा करतो आपण हा 'वाद'? कसा वाढवतो? कसा बिघडवतो? घडवतो तोच मुळी बिघडवत. व्यक्ती, घटना, प्रसंग यांचा करून टाकलेला चेंदामेंदाच शिजवतो. त्याने त्रासतो, चिडतो, रागावतो, कधी संतोष पावतो, आनंदतो, पण एक नक्कीच की त्यात गुरफटतो. नुसते गुरफटतो असं नाही, तर चांगलेच वावटळीत सापडतो. त्यातून बाहेर येणं जमत नाही. भोवऱ्यात सापडल्यासारखे गर-गर फिरतच राहतो. REBT ने हे लक्षात आणून दिले. किमान काही प्रमाणात त्याचा फायदा झाला. काही सवयी त्यातून लावून घेणे अत्यावश्यकच वाटू लागले. काही सवयी-पद्धती लावूनही घेतल्या, परंतू मूळ प्रश्न कायमच होता.

माणसामध्ये निर्माण होणारे विचार येतात कुठून! कोण आणतो हे विचार? विचार अमूक एका प्रकारचेच का येतात? चांगले उत्तम, सुंदर, उदात्त विचारांचे प्रमाण अल्प का? असे विचार लवकर लुप्त का होतात? त्यांचा प्रभाव टिकत का नाही? असे विचार टिकावेत यासाठी काय करावे? उत्तर सापडत नव्हते.

पुस्तकांची नाळ तुटत चालली होती. पुस्तकं त्रासदायक वाटत होती. वर्तमानपत्रादी वाङ्मय तर भयानक होतं. संकल्पविकल्पाच्या आंदोलनात तर तडफडच हाती येत होती. एक महा विलक्षण पोकळी निर्माण झाली होती. आनंदाचं निधान कुठे आहे? चिरस्थायी सुख-शांती-स्वास्थ कशात आहे? काय केलं की ही पोकळी भरून येईल? काय वाचलं की शांती लाभेल? कोणाशी संवाद साधला की मनाचा वाद मिटून 'संवाद' सुरू होईल? पूर्वी पुस्तकांशी होत असलेला 'वाद' जवळजवळ नको झाला होता. मग काय करायचे? प्रन्न-प्रश्न आणि प्रश्नच.

याच काळात श्रीवामनराज प्रकाशनाची पुस्तकं आली. त्यांनी वाद मिटवला व संवाद सुरू केला. हा संवाद सुरेख होता. तालबद्ध होता. सुसंस्कारित करणारा होता. शोधाला दिशा देणारा होता. शोध अर्थातच 'स्व'चा.

आयुष्याची लांबी आपल्या हातात नसते, पण रुंदी व खोली निश्चितपणे आपल्या हातात असते.

'स्व'च्या वागण्याचा. 'स्व'च्या जगण्याचा. मूर्खपणाचा. अढ्यतेचा. अहंकाराचा, खोट्याच उपऱ्या अनुभवशून्य ज्ञानावर बांधलेल्या गणिताचा. दुसऱ्यांच्याच प्रमाणपत्रावर तलवार चालवण्याच्या पराक्रमाचा. देहबुद्धीतच जगत राहण्याच्या केंद्राचा.

आयुष्यात आलेलं हे वाङ्मय अर्थातच मराठी संत वाङ्मय होतं. श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून श्रीसंत निळोबारायांपर्यंतच्या सातशे वर्षातील वाङ्मयाचे, संतांच्या अनुभूतीचे दाखले ठिकठिकाणी होते, तरीही प्रामुख्याने श्री ज्ञानेश्वर, श्री तुकाराम आणि श्री समर्थ रामदासस्वामी महाराज्यांच्या वाङ्मयावर - विवेचनावर भर होता. आणि श्रीज्ञानेश्वर महाराजांचे वाङ्मय हा तर त्यांचा प्रमुख आधार होता.

वाचत गेलो तसतसा तिढा सुटत चालला. सुटलाय असं मात्र नाही, पर जे शोधतोय, ज्यासाठी तळमळतोय ते सारं इथेच आहे की! पुस्तकांशी संवाद सुरू झालाय. शब्दांची स्पंदनं अलौकिक आहेत. 'ती' स्पंदनं, वर्णन नाही करता येतं. त्यांचा फक्त अनुभवच घेता येऊ शकतो.

मराठी संत साहित्य विलक्षण आहे. बी.ए., एम.ए. च्या पदव्यांनी नाही दिली ती दृष्टी. काव्य, काव्यसृष्टी, काव्यसौंदर्य, काव्यलक्षणं असलंच भरताड-भारूड अभ्यासक्रमांनी शिकवलं. साधं त्या वाङ्मयाविषयी प्रेमही लावू शकलं नाही आमचं आधुनिक विद्यापीठ. अर्थात याचा दोष माझ्याकडेच असेल. नव्हे, आहेच. संतसाहित्यात असणारा गूढार्थ, योगार्थ समजावून सांगितला नाही. सरलार्थ सांगितला. पण सांगणार तरी कसा! तसा अनुभव असेल तरच तो अर्थ समजणार, जाणवणार आणि मगच सांगितला जाणार ना?

श्री. मामांनी प्रथम अनुभवले मग सांगितले. जे काही सांगितले ते सांगण्याची हातोटी विलक्षण वेगळी होती. मराठी वाङ्मयात तरी मला अशी 'संवादी' शैली फारशी कुठे सापडलीच नव्हती, ती इथे सापडली. आपल्या मनातल्या शंका हेरून, त्यांना अचूक आणि घरगुती, नेहमीच्याच जगण्या-वागण्याची उदाहरणे देऊन श्रीमामांनी आणि त्या पुस्तकांनी माझ्या मनाचा वेध घेतला. एकदा, दोनदा नव्हे, तर चार-चार, पाच-पाच वेळा मी ही पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचली आहेत. अजूनही वाचतोच आहे. प्रत्येक वेळी नवेच गवसते आहे. मागच्या वाचनात जे सुटले होते, ते नंतरच्या वाचनात समोर यावे आणि शंका आपोआप फिटल्या जाव्यात, असा एक साधा-सोपा प्रवास मी अनुभवतोय. शब्दांचं सामर्थ्य असं हवं. अनेकदा लेखनात लेखक लपलेला असतो, त्याची देहबोलीही लपलेली असते, ती प्रत्यक्षात वाचकाला अनुभवता येते, इतकं समर्थ कौशल्य काही मोजक्या लेखकांच्या शैलीत असतं, शब्दात मात्र नसतं. शैलीत आणणं आणि स्वतंत्र एकेका सुट्या शब्दात ती ताकद ओतणं कठीण आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलींकडे अशी ताकद होती. 'ऐसी अक्षरे रसिके मेळविन' शब्दच काय, ते 'अक्षरां'च्या शक्तीची किमया सांगत आहेत. श्रीमामा नेमकी हीच 'शक्ती' सांगू पहात आहेत. ती समजण्याची पात्रता मात्र आपल्यापाशी यायला हवी किंवा असायला तरी हवी.

मराठी संतवाङ्मयाचा गाभा, जो आमच्यापर्यंत आलाच नाही, आणि जो आला, त्याने आम्हाला नको तेवढे तर्ककर्कश केले, ते का? आम्ही आमचीच परंपरा का नाकारली? नुसती नाकारलीच असं नाही झालं, तर ती आम्ही खोटीच का ठरवली? ग्राह्यच न धरायला आम्ही शिकलो. थोतांड, बनवेगिरी, छाछूगिरी, असली लेबल्स आम्ही त्यावर मारली. संतांनी अमूक केलं नाही, तमूक भूमिका घेतली नाही, हे करायला हवे होते, ते करायला हवे होते. असल्या विधानांची राळ गेली दोनशे वर्षे उडत राहिली आहे. त्यातून मूळ गाभाच निसटून गेलाय का?

भालचंद्र नेमाडे यांनी देशीवादाची भूमिका मांडून याला छेद द्यायचा प्रयत्न केला होता. त्या त्यांच्या

भूमिकेवरही बराच वाद घातला गेला आहे. त्यात मी सुद्धा होतोच. आता मात्र लक्षात येतंय की, नेमाडे यांचा मुद्दा अधिक व्यापकच करायला हवा. इंग्रजी शिक्षण प्रणालीने आमच्या वाङ्मयाचा, संस्कृतिक, आदान-प्रदानतेचा, चेहराच बदलून टाकला आहे आणि आम्ही गेली दोनशे वर्षे वेड्यासारके बरळतो आहोत. याची साक्ष सात्र लॉर्ड मेकॉलेच्या १२ ऑक्टो. १८३५ च्या एका पत्रात सापडते. आपल्या वडिलांना लिहिलेल्या पत्रातील एक वाक्य असे आहे की, ''ज्या हिंदूंनी ब्रिटीश शिक्षणपद्धतीनुसार शिक्षण घेतले आहे, त्यापैकी एकही हिंदू त्याच्या धर्माशी प्रामाणिक राहत नाही. काहीजण वरवर प्रामाणिकपणा दाखवतात, परंतु तो त्याचा दिखावा असतो. बहुतेकजण स्वत:ला भौतिकवादीच समजत आहेत...'' (''No Hindu who had received English Education ever remains sincerely attached to his religion. Some continue to profess it as matter of policy, but many profess themselves puredeists...'')

लोकहितवादींपासून आगरकरांपर्यंत (चिपळूणकरांचा रानडेंचा अपवाद वगळता) सर्वच सुधारकांनी भारतीय श्रद्धास्थानांना मोडीतच काढले. ही आपली चूक झाली का? याची पुनर्तपासणी करायला हवी. धर्माचं, ईश्वराचं अधिष्ठान मानवी जीवनातून काढून टाकलं तर त्याच्या इतके भक्कम अधिष्ठान दुसरे कोणते? बुद्धीवादाने मानवी जीवनाची गुंतागुंत उकलली जाते का?

मी योजलेल्या असंख्य गोष्टींपैकी काहीच पूर्ण होतात व अनेक पूर्णत्वाला जात नाहीत, त्याचे कारण काय? मला अमूक एका प्रकारचेच आयुष्य लाभते, ते का? यापेक्षा वेगळे आयुष्य का लाभत नाही? माझ्या जन्माचेच प्रयोजन काय? मी कशासाठी आलो आहे? माझ्या आयुष्याचा अंतिम हेतू काय? माझी माणसे निवडण्याचं स्वातंत्र्य मला का नाही? भारतीय तत्त्वज्ञान, संतसाहित्य मात्र या प्रश्नांना उत्तरे देतात. नेमकी हीच गोष्ट महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, योगी अरविंद, विनोबा भावे, सानेगुरूजी यांना सापडली होती. स्वातंत्र्य आंदोलनात सापडलेली नस पुढे पुढच्या पिढीने सोडून दिली. हाच धागा पुढे भारतीय नेतृत्वांकडून विस्तारत गेला असता, तर कदाचित आज भारतीय समाजाची जी घसरण झालेली आहे, ती झाली नसती. लो. टिळक ते विनोबांपर्यंत भगवद्गीतेला त्यांनी दिलेलं अनन्यसाधारण महत्व, समाजाचा, व्यक्तीचा विकास होण्यासाठी पुढेही अत्यावश्यक होतं. पुढे मात्र ही नाळ तुटली आणि समाज धड बुद्धीवादीही झाला नाही व गीतेच्या तत्त्वज्ञानाची नाळ तुटल्याने त्यांची सैरभैर अवस्था झाली. याच सैरभैर अवस्थेत असताना, समाज अंधश्रद्धेला बळी पडला. संतसाहित्याची नाळ तर पेशवाई अखेर तुटून पडली होती. नवशिक्षणाने याचा विचारच केला नाही. 'पाश्चिमात्य ज्ञानाच खरं' अशी आमची मनोधारणाच झाली.

'जेथे जातो तेथे 'मी' माझा सांगाती' असा अनुभव कदाचित मर्ढेकरांना पचवता आला असेल, पण इतरांचे काय? इतरांनी फक्त शब्दानुभव घेतला, त्याचे काय? सद्गुरूशिवाय विंदांची 'सोय' कदाचित लागलीही असेल, पण इतरांना खरोखरच अशी 'सोय' सापडली का? की आम्ही विंदांचा केवळ शब्दानुवादच केला? शब्दानुवादच करायला शिकलो? शिकवले गेलो? 'एक तरी ओवी अनुभवावी' असा जो श्रीसंत नामदेवमहाराजांचा 'सांगावा' होता व पुढे साऱ्याच संतवाङ्मयाने तो अनुभवला, तो नवसाहित्याने नाकारला. हा नकारच आम्हाला मारक ठरला का? अनुभवाच्या प्रांतालाच नाकारत राहिला का?

शहरी संस्कृतीचा विचार शहरी संस्कृतीने जोपासला व तो साऱ्या आत दुनियेचा असल्याचा भासवला. संत वाङ्मय मात्र खेडोपाडी, देवळीरावळी, वारी-जत्रेत संतसाहित्य कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमांतून जनमानसापर्यंत अदान-प्रदान करीत राहिले आहे व त्यामुळेच ते टिकूनही आहे. पुढेही टिकणार आहे.

अस्वस्थपणा आणि उतावळेपणा या दोन व्याधी आहेत, त्या दोन्ही आयुष्य हिरावून घेतात - म. गांधी

ज्या अनेकांनी ही परंपरा जोपासली, त्यात श्री. मामासाहेब देशपांडे यांचा वाटा मोठा आहे. त्यांच्या विवेचनाचा आहे, संप्रदायाचा आहे. निरुपणाचा, शैलीचा आहे, पण त्याहीपेक्षा मोठ्या पटीत तो अनुभवाचा आहे. अनुभूतीचा आहे.

'सद्‌गुरूवाचोनि सापडेना सोय' याचीच प्रचीती आणून देणारा आहे. श्री. मामांच्या वाङ्मयाने इथपर्यंत आणून ठेवलंय. त्यातील सामर्थ्याने मिळालेली दिशा विलक्षण आहे. अनन्य आहे.

अनेकांनी आपापल्या आयुष्यात आलेल्या पुस्तकांची व त्या पुस्तकांनी त्याचे आयुष्य कसे बदलून टाकले, याची वर्णने केली आहेत. व्यवसायामुळे असंख्य पुस्तके पाहिली, आवडीमुळे काही वाचली, पण इतरांना जसे वाटले होते तसे मला का जाणवले नव्हते? आयुष्य बदलून टाकणारे कोणतेच पुस्तक मला का सापडले नव्हते? श्रीमामांची सामर्थ्यशाली पुस्तके वाचनात यायची होती म्हणून? की अन्य काही? काही कोडी सुटत नसतात हेच खरे. काही आज सुटत नसतात. यांची उत्तरे मला सापडतील? की सापडणार नाहीत? उत्तरे सापडो वा न सापडो, ही पुस्तके आयुष्यात आली, वाचून घेतली गेली, हे काय कमी आहे?

**डॉ. प्रदीप कर्णिक**
फ्लॉवर व्हॅली, नारळीपाडा,
ठाणे - ४०० ६०१

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
*२५४२६२७०*

गृहस्थाश्रम हा सर्व आश्रमधर्मांमध्ये अत्यंत श्रेष्ठ आहे. कश्यप ऋषी गृहस्थाश्रमाविषयी म्हणतात, ''अर्थात: संप्रवक्ष्यामि गृहस्थाश्रममुत्तमम्। य आधारोऽन्याश्रमाणां भूतानां प्राणिनां तथा। ऋणत्रयच्छेदकारि धर्मकामार्थसिद्धिदम्।।'' गृहस्थाश्रम हाच अन्य आश्रमांचा सर्वस्वी आधार आहे. तसेच मनुष्यमात्राचा आणि भूतमात्राचाही तोच आधार आहे. मनुष्याला निसर्गत:च देव, ऋषी, पितर ह्यांचे उपकार स्वीकारावे लागतात. गृहस्थाश्रमधर्मपरिपालनानेच आपण त्या उपकारांतून थोडे तरी उतराई होऊ शकतो. धर्म, अर्थ आणि काम ह्यांचे श्रेयस्कारी साफल्य गृहस्थाश्रमांतच साधता येते. गृहस्थाश्रम धर्माचरणाची योग्यता विवाहसंस्कारानेच प्राप्त होते. हे विवाह आठ प्रकारचे आहेत.

| | |
|---|---|
| १) ब्राह्मविवाह | २) दैवविवाह |
| ३) आर्षविवाह | ४) प्राजापत्यविवाह |
| ५) आसुरविवाह | ६) गांधर्वविवाह |
| ७) राक्षसविवाह | ८) पैशाचविवाह |

वधूप्राप्तीच्या निरनिराळ्या प्रकारांनुसार सामान्यत: हे विवाहप्रकार झाले आहेत असे म्हणता येईल. त्या सर्वांत ब्राह्मविवाह अत्यंत श्रेष्ठ आहे. ब्राह्मविवाह कार्यामध्ये वराला सत्कारपूर्वक बोलावून अलंकारयुक्त अशा कन्येचे दान त्याला करावयाचे असते.

ह्या ब्राह्मविवाह विधीमध्ये विवाहहोम आणि गृहप्रवेशनीय होम हे दोन विधी सूत्रकारांनी सांगितले आहेत. विवाहहोमामध्ये होम, पाणिग्रहण, लाजाहोम, अग्निप्रदक्षिणा, अश्मारोहण, सप्तपदी आणि ध्रुवादिदर्शन इतके विधी सामान्यत: समाविष्ट असतात आणि गृहप्रवेशनीय होमामध्ये गृहप्रवेश, होम, वधूला

(पुढील भाग पान २५ वर)

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

# २५ वर्षांची गौरवशाली वाटचाल - एक सिंहावलोकन

*वि.प्र.मंडळाच्या तंत्रनिकेतनाची वाटचाल जवळून अनुभवलेले संस्थेचे ज्येष्ठ सदस्य श्री. श्री.वि. करंदीकर यांनी शब्दबद्ध केलेला हा 'लघु इतिहास'! श्री. करंदीकर यांचेही या वाटचालीत महत्त्वाचे योगदान आहे.- संपादक*




**तंत्रनिकेतनची इमारत**



**कै. रा. कृ. गोखले**



**कै. डॉ. वा. ना. बेडेकर**

**इवलेसे रोप :**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ही अनेक तांत्रिक ज्ञान शाखांतील पूर्णवेळ व अर्धवेळ अभ्यासक्रम उपलब्ध असणारी संस्था आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तंत्रकुशल मनुष्यबळाचा असणारा अभाव ही देशापुढील मोठी समस्या होती. यावरील उपाय म्हणून व काळाची गरज ओळखून विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारिणी सदस्य व स्वतः विद्युत अभियंते असणारे (कै.) रा.कृ. गोखले यांनी तंत्रनिकेतन स्थापन करण्यासंबंधातील प्रकल्प अहवाल विद्या प्रसारक मंडळाला सादर केला. अपारंपारिक स्वरूपाचे रसायन अभियांत्रिकी, इलेक्टॉनिक पॉवर सिस्टीम, औद्योगिक इलेक्ट्रॉनिक्स् व इंस्ट्रुमेंटेशन हे चार अभ्यासक्रम समाविष्ट असलेला हा तपशीलवार अहवाल होता. या प्रकल्पासाठी एक कोटी पंचाहत्तर लाख रुपयांची त्या काळात निकड होती.

(कै.) गोखले यांच्याइतकेच उत्साही असणारे व दूरदृष्टी लाभलेले वि.प्र. मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांनी एका बैठकीत अहवाल सादर करून त्यास पाठिंबा दर्शविला. मंडळाच्या सर्व सदस्यांनी राज्य

शासनाला विचारार्थ अर्ज करण्यासाठी आपली समंती दर्शविली. आवश्यक ती अनुमती मिळाली व या प्रकारे 'वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन' जून १९८३ मध्ये अस्तिवात आले.

जागेची कमतरता व प्रयोगशाळांची सोय यासाठी तात्पुरत्या स्वरूपात तंत्रनिकेतन बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीत सुरू झाले. नंतर स्वतःची स्वतंत्र इमारत तयार होईपर्यंत, म्हणजे १९९१ सालापर्यंत तंत्रनिकेतन विधी महाविद्यालयाच्या इमारतीत स्थलांतरित झाले. तेव्हापासून त्याची सातत्याने वाढ व प्रगती होऊ लागली. प्रगतीचा आलेख उंचावू लागला. ही वाढ व प्रगती शैक्षणिक बाबींबरोबरच सर्वांगीण होती.

**अभ्यासक्रम :**

त्यानंतर जेव्हा आणि जशी गरज पडली तशी संस्थेने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने (म्हणजेच एआयसीटी ने) मंजूर केलेल्या माहिती तंत्रज्ञान, संगणक अभियांत्रिकी व वैद्यकीय इलेक्टॉनिक्स् अशा अभ्यासक्रमांची सुरुवात केली. या अभ्यासक्रमांबरोबरच महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीने पुढील चार अभ्यासक्रम सुरु करण्यात आले.

१. संगणक, सॉफ्टवेअर पद्धती, विश्लेषण व उपयोजन - पदविका

२. औद्योगिक सुरक्षा - पदविका

३. संगणक देखभाल अभियांत्रिकी - पदविकेनंतरचा अभ्यासक्रम

४. रोबोटिक्स व ऑटोमेशन - प्रगत पदविका

काळाच्या ओघात शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी, अलिकडेच संस्थेने तीन प्रगत अभ्यासक्रम दोन सत्रांत प्रस्तावित केले आहेत. हे अभ्याक्रम तीन वर्षांचे आहेत. संगणक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान व इलेक्ट्रॉनिक्स आणि टेली कम्युनिकेशन हे ते अभ्याक्रम आहेत व पदविका स्तराचे आहेत.

आज मितीस तंत्रनिकेतनाच्या पूर्णतया कार्यरत अशा पाच इमारती आहेत. या इमारतीत कार्यशाळा, प्रयोगशाळा व इतर भागांचा समावेश आहे. खास राखून ठेवण्यात आलेल्या पाच एकर जमिनींवर या इमारती आज उभ्या आहेत. हा भाग महाराष्ट्र शासनाने १९६८ व १९७८ साली विद्या प्रसारक मंडळाला दिलेल्या १३.५ एकर जमिनीपैकी आहे. ही जमीन शैक्षणिक उपक्रमांसाठी मंडळाला देणगी स्वरूपात देण्यात आली होती.

**अद्ययावत :**

आजवर विद्या प्रसारक मंडळाने आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी बरीच मोठी रक्कम गुंतवली आहे. अद्ययावत प्रयोगशाळा, माहिती तंत्रज्ञान व संगणक केंद्र, परिषद सभागृह, चित्रकला सभागृह, ग्रंथालय व त्यातील बारा हजार पाचशे तांत्रिक पुस्तके आणि नियतकालिके या सर्व सोयी आहेत. या सर्वांसाठी योग्य पात्रता असणारा कर्मचारी वर्ग नेमण्यात आला आहे. सर्व अभ्यासक्रमांत त्यांच्या दाखल क्षमते इतके म्हणजे सुमारे १२०० हून आधिक विद्यार्थी तंत्रशिक्षणासाठी नोंदून घेतात. यासाठी लागणारा प्रचंड खर्च मंडळ औद्योगिक क्षेत्राकडून, हितचिंतकांकडून, दानशूर मंडळींकडून तसेच संगीतातील मोठ्या कलावंतांच्या कार्यक्रमांतून, स्मरणिकांच्या जाहिरातीतून उभा करते. लागल्यास आर्थिक संस्थांकडूनही अर्थ साहाय्य घेतले जाते.

प्रत्येक विद्यार्थ्यांत दृष्टी निर्माण करणे, कौशल्ये निर्माण करणे व त्याला उपयुक्त असे आवांतर ज्ञान देणे हे आपल्या इतर घटक संस्थाप्रमाणेच तंत्रनिकेतनचेही धोरण आहे. मूल्ये, विचारक्षमता व शिस्तपालन यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याची प्रेरणा शिक्षकांना दिली

जाते; जिचा उपयोग पुढील जीवनातील आव्हानांना सामोरे जाताना विद्यार्थ्यांना होतो.

**नेतृत्व :**

सुरुवातीस (कै.) रा. कृ. गोखले यांना प्रकल्प संयोजक म्हणून तंत्रनिकेतन चालवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. त्यानंतर प्रथम प्राचार्य म्हणून श्री. के. जी. वझे यांनी जुलै १९८४ ते जून १९८६ या कालावधीत काम पाहिले. त्यानंतर हे महत्त्वाचे पद उपलब्ध असणाऱ्या अर्हताप्राप्त शिक्षकांच्या पदोन्नतीने अनुभवी अशा सी. श्री. मुजुमदार यांच्या नेमणुकीने भरण्यात आले. प्राचार्य मुजुमदार ३१ मे २००४ रोजी निवृत्त होईस्तोवर पदावर कार्यरत होते. त्यांच्या निवृत्तीनंतर १ जून २००४ पासून प्राचार्य दि. कृ. नायक या महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. सुरुवातीपासून या प्राचार्यांनी संस्थेच्या पूर्ण सहकार्याने तंत्रनिकेतनास देदीप्यामान असे यश व नाव प्राप्त करून दिले. आपल्या सहकाऱ्यांशी उत्तम संबंध ठेवत विद्यार्थ्यांमध्ये शिस्तपालन व आदरभाव त्यांनी निर्माण केला आहे.



प्रा. वझे



प्रा.मुजुमदार



प्रा. दि. कृ. नायक

२५ वर्षे निघून गेली व २००७-२००८ हे रौप्यमहोत्सवी वर्ष पाहता पाहता उजाडले. तंत्रनिकेतनासाठी हे २५ वे वर्षे ऐतिहासीक आहे. परिषद, संमेलने, विशेष व्याख्याने व तांत्रिक विषयांवरील प्रदर्शने भरवून विद्यार्थ्यांना लाभ हाईल अशा तऱ्हेने, योग्य पद्धतीने हे वर्ष साजरे केले जात आहे.

**मूल्यांकन :**

देशाचे भाविष्य औद्योगिक व तांत्रिक विकासावर अवलंबून आहे. या तांत्रिक विकासाबरोबरच शिक्षण उत्तम नागरिक घडवत असते. एआयसीटीइने मूल्यांकन

कार्यक्रमांची अंमल बजावणी करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय मूल्यांकन मंडळाची निमिर्ती केली आहे. हे मंडळ देशातील तंत्रज्ञान संस्थांच्या वाटचालींचे मूल्यांकन करून त्यांना उद्योगविश्व, विद्यार्थी, समाज या लाभार्थींच्या दृष्टीने लागणाऱ्या गरजा कशा भागवायच्या या हेतूने कार्यरत आहे. या दृष्टीने मंडळाचे काही कार्यक्रम, काही निकष आहेत.

आमच्या तंत्रनिकेतनाची २००३ साली पदविका अभ्याक्रम राबवणारी स्वंयपूर्ण संस्था म्हणून सदर मंडळाने मूल्यमापन केले. अशा प्रकारची मुंबई विभागातील ही पहिली संस्था असल्याबद्दल मंडळाने मत नोंदून हे मूल्यांकन तीन वर्षांसाठी केले होते. संस्थेचे नाव आंतरराष्ट्रीय नकाशात नेणारे व विद्यार्थ्यांना मान्यता मिळवून देणारे हे फार मोठे यश होते. या मूल्यंकनाने संस्थेला चांगलीच प्रेरणा मिळाली व तिच्या विद्यादानाच्या कार्यास मान्यता व गुणवत्तेची खात्री लाभली. विद्या प्रसारक मंडळ, इतर घटक संस्थांसह गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास बांधील आहे; तंत्रनिकेतनही त्याला अपवाद नाही.

**महत्त्वाच्या परिषदा :**

तंत्रनिकेतनाची आयएसटी चाप्टरची सदस्यत्व नोंदणी झाली आहे. या चाप्टर मार्फत परिषदांचे आयोजन, उद्योगांना भेटी विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी आयोजिल्या जातात. तसेच विद्यार्थ्यांचे तंत्रविषयांचे ज्ञान वाढावे, कौशल्ये वाढावीत म्हणून आयएसटी चाप्टर विविध माहितीपूर्ण उपक्रमांचे आयोजन करते. यासाठी वादविवाद स्पर्धांचे आयोजन केले जाते. आयएस्टी चे सभासदत्व हा बहुमान आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक स्थानिक राष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा यांचे आयोजन करून आजच्या संदर्भात महत्त्वाच्या ठरणाऱ्या, पर्यायी उर्जास्त्रोत, पाणी, जीओ इन्फॉटिक्स (दूरसंवेदनशास्त्र), औद्योगिक सुरक्षा, आरोग्य व पर्यावरणाची सुरक्षितता इ. विषयांना व्यासपीठ निर्माण करून देण्यात आले.

**माजी विद्यार्थी :**

तंत्रनिकेतनचा माजी विद्यार्थी संघ कार्यरत असून त्याचे हजाराहून अधिक सदस्य आहेत. वर्षांतून दोनदा त्यांच्या सभा होतात. या सभांस विद्यमान विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पदभरती, चर्चा, मार्गदर्शन, उद्योगांना भेटी इ. विषयांवर विचार विनिमय होऊन विद्यार्थ्यांना पुढील विकासासाठी प्रशिक्षण देण्यासंबंधीच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यात येतो. यांतील अनेक सदस्य हे आंतरप्रुनर्स, सल्लागार, स्वयंउद्योजक आहेत याची विशेष नोंद घ्यावयास हवी. हे सर्व तंत्रनिकेतनाचे ऋण मान्य करतात. त्यापैकी अनेकांना खूप चांगल्या संधी मिळाल्या असून ते उच्चपदांवर अधिकारी म्हणून उद्योग व खाजगी क्षेत्रांत कार्यरत आहेत.

पॉलिझिन हे तंत्रनिकेतनाचे वार्षिक प्रकाशन आहे. हे वार्षिक विद्यार्थ्यांना चांगले व्यासपीठ निर्माण करून देते. वर्षभरातील विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रांतील कामगिऱ्या, शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे योगदान समजण्याच्या दृष्टीने पॉलिझिन हा चांगला आरसा आहे.

विद्या प्रसारक मंडळाच्या इतर घटक संस्थांत तंत्रनिकेतन अतिशय उत्तम कामगिरी बजावून प्रथम क्रमांकावर आहे. रौप्यमहोत्सवा बरोबरच सुवर्णमहोत्सवी वाटचालीसाठी मी तंत्रनिकेतनास मनःपूर्वक शुभेच्छा देतो. त्यानंतरही तंत्रनिकेतनाची वाटचाल उज्ज्वल होवो!

(हा लेख डॉ. वा.ना. बेडेकर व रा.कृ. गोखले यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ लिहिला आहे)

**श्री. श्री. वि. करंदीकर**
ज्येष्ठ सदस्य, विद्या प्रसारक मंडळ
**मराठी रूपांतर -** प्रा. मोहन पाठक, ठाणे.
(पॉलिझिनवरून साभार)

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडिल व साधना

*शुनःशेप आख्यानाचा संदर्भ घेऊन केलेले विवेचन हा लेखमालेतील पुढील लेख आहे - संपादक*

**प्रास्ताविक :**

जुलै २००८ च्या दिशा मासिकाच्या अंकात, आपण वैदिक बीज संकल्पना काही स्वरूपांत पाहिली.

पण, काय महत्त्व आहे, बीज संकल्पना समजावून घेण्यात? सध्याच्या मानवी समाजात पाश्चात्य भौतिक विज्ञानांतील ज्ञानातील प्रमेयांवर पूर्ण विश्वास आहे. हे विज्ञान त्यांना विश्वाची गूढे उलगडून दाखविण्यात यशस्वी होईल अशी त्याची 'श्रद्धा' सुद्धा आहे.

मी **'श्रद्धा'** हा शब्द हेतूपूर्वक वापरला आहे. कारण 'भौतिक विज्ञानाच्या मर्यादा व त्या विचारपद्धतीच्या, तर्कशास्त्राच्या बंदिस्त चौकटीसुद्धा वेळोवेळी विषयाच्या अनुषंगाने विशद केल्या आहेत. मी वारंवार उल्लेख करत असलेल्या **"End of Science"** लेखक **John Horgan** [ब्राडवे बुकस 1997ISBN 0-553-06174-7(Pbk)] ह्यांच्या पुस्तकात, जास्त विस्ताराने व मनोरंजक पद्धतीने हाच मुद्दा फिलॉसॉफी, फिजीक्स, कॉसर्मोलाजी, बायॉलॉजी, सोशल सायन्स, न्यूरोसायन्स, कॅओप्लेक्सिटी, लिमिटॉलॉजी, मशीन सायन्स वगैरे पाश्चात्य संस्कृतीतील भौतिकवादी शास्त्रांच्या थोर प्रसिद्ध दिग्गज वैज्ञानिकांनी दिलेल्या मुलाखतीतील जबाबावरून, मांडण्यात आला आहे.

थोडक्यात हा 'कबुली जबाब' कोणत्या धर्तीचा आहे? त्यांच्या अलग अलग विज्ञान शाखांच्या संशोधनातून, तर्कपद्धतीतून विश्वाच्या उगमाचा, दिशेचा, रहस्यांच्या अंतिम सत्याचा, जीवनाच्या मूलभूत प्रश्नांचा शोध लागणे अशक्यप्राय होत आहे!! आशा जिवंत आहे, पण दिशेचीही खात्री नाही !!

अशी त्यांची अवस्था कां व्हावी कारण, त्यांच्या विचारपद्धतीला, शोधपद्धतींना मर्यादा व बंधने आहेत.

तसेच त्या वैज्ञानिकांच्या बुद्धीला व तर्कसंगतींनाही मर्यादा आहेत. सर्वसाधारण, मानवी जीवला निसर्गनिर्मीत बुद्धीच्या मर्यादा ओलांडता येत नाहीत!!

**विश्व व्यापाराची बीज संकल्पना:**

त्यामुळे, प्रकृतीच्या अगोदरच्या मूळ 'बीजावर' वा बीजसंकल्पनेवर आणि बीजसामर्थ्यावर जी सृष्टी निर्मीती झाली, त्या निर्मीत पदार्थांवरच सुरवात करून व आधार घेऊनच, ह्या पाश्चात्य भौतिक विज्ञानाची 'प्रगती' झाली आहे. तिला दुय्यम, कनिष्ठ व 'Marginal Additions, modifications' एवढेच स्थान आहे. ह्या विज्ञानाला कुठल्याही पदार्थाच्या, रसायनाच्या, वनस्पतीच्या, प्राण्याच्या मूळ बीजसंकल्पनेपर्यंत जाण्याचे सामर्थ्य नाही.

जसे लहान मुलांच्या खेळण्यांत काही ठोकळे दिले जातात व त्यांच्या अनेक रचना करून निरनिराळे आकार व रचना लहान मुले निर्माण करूं शकतात. पण तो ठोकळा, किंवा ज्या वृक्षाच्या लाकडाचे मूळ झाड, या पृथ्वीवर निर्माण झाले, त्याच्या बीजापर्यंत ही लहान मुले जाऊं शकत नाहीत. ज्या मुलांना ज्ञानाच्या मर्यादा आहेत त्याच धर्तीच्या मर्यादा ह्या पाश्चात्य वैज्ञानिकांच्या संशोधनाला मूलत: आहेत.

**नवीन बीज निर्मीती असमर्थता :**

ही बीज निर्मीती करता येत नाही. ही आधुनिक विज्ञान शास्त्राची मर्यादा आहे. एव्हढेच नव्हे, तर त्या बीजाला योग्य भूमी व योग्य पूरक वातावरण, जल यांचा पुरवठा

झाल्यावरच जी वृद्धी वृक्षरूपांत होते, त्या वृक्षालाही नंतर इतर वृक्षाच्या फुलांच्या जातीने संकर होऊन फळ निर्माण होते. हा कुठल्या योजनेचा भाग आहे ह्याचे पण ज्ञान नाही पुन्हा ह्या वृक्षाला येणाऱ्या फळात पुन्हा मूळ बीजाचीच झाडाला आलेल्या फळाच्या आंत किंवा बाहेरही (उदाहरणार्थ काजूची बी) निर्मीती होऊन हा जीवनप्रवास अनंत काळपर्यंत चालू राहील याची योजना कोणी केली, कां केली व तिचा उद्देश काय असावा असे प्रश्न पडत नाहीत.

पण, हे प्रश्न भारतीय ऋषींना पडले आणि तसे ते पडून मानवी ज्ञानाला संशोधनाची एक विवक्षित दिशा मिळाली, ह्या उद्देशाने अनेक उपनिषदे लिहिली. त्यातीलच एक प्रश्नोपनिषदं होय. वरवर पाहिले तर त्यांतील प्रश्नांची उत्तरे साधी आहेत असे वाटेल. पण असे फसूं नका. ह्या प्रश्नांना एक निराळी, वेगळी व स्वतंत्र अशी प्रश्नपद्धती आहे. त्या प्रश्नांना एक आंतरिक दिशा आहे, आणि त्या प्रश्नांची मालिका व त्यावरील उत्तरे यांची ही फटाक्याची माळ- ही तुमच्या 'काँशसनेसला' एका विशिष्ट तऱ्हेची पद्धती आंगिकारावयाला उद्युक्त करते हा विषय **भारतीय वैदिक ज्ञानपद्धतीच्या शास्त्राचा** Vedic Epistemology चा आहे.

**अरविंदाची सावित्री व मृत्यू संकल्पना :**

ह्याला एक समांतर उदाहरण आहे. महायोगी अरविंद यांच्या 'सावित्री' ह्या महाकाव्यात अशीच प्रश्नोत्तरांची सरबत्ती आहे 'मृत्यू, जीवन, प्रेम' या विषयावर सावित्री, नारद, यम यांच्यामध्ये संवाद आहेत. पण, काय रोख आहे ह्या महाकाव्याचा?

मदर म्हणजे महायोगी अरविंद यांची (ऑकल्टिस्ट व नंतर अरविंदाच्या The life Divine ह्या फिलॉसॉफीची) सहकारिणी, म्हणाली होती कीं ''सावित्री' हा 'पंचम वेद' आहे आणि ह्या सावित्रीचे अध्ययन व चिंतन करणारा हा कोणीही 'कळत नकळत' अरविंदाच्या इंटिग्रल योगाचीच साधना करत असतो.''



सावित्री

ह्या 'इंटिग्रल योगांत' मानवी लहान पातळीवरच्या प्राणी वृत्तीच्या व स्तरावरच्या काँशसनेसचा संवाद हा सुप्रीम काँशसनेसशी (ईश्वरी काँशसनेसशी) जोडला जातो व त्याची पातळी सहज चिंतनांत उंचावण्याचीच ही साधना घडते.

**Cosmic Reality भौतिक शास्त्रांची असमर्थता:**

आपल्याला ज्या अंतिम सत्याचा शोध घ्यावयाचा आहे त्याला आधुनिक भौतिक विज्ञानवादी, विचारवंत Abstract absolute Reality असे म्हणतील.

पण, त्याचा शोध घेणारा हा एक मर्त्य मानवच आहे. त्याच्यापुढे जो Data वा 'सामुग्री' प्रकृतिच्या पसाऱ्यांत मांडली आहे ती देखील नाशिवंत आहे. ह्या मानवाच्या बुद्धीचे डिझाईन व त्याला पूरक असणारी शरीर यंत्रातील इंद्रिये ही देखील मर्यादांनी बांधलेली आहेत. तेव्हां या

इंद्रियजन्य ज्ञानाच्या तोकड्या टेलीस्कोप, मायक्रोस्कोप मधून सत्य ज्ञान मिळणे अशक्यप्राय आहे. कारण, ह्या भौतिक ज्ञानाची वर्गवारी ही 'भेदात्मक' ज्ञान Relationist अशी आहे. मग, हे 'एकात्म ज्ञान' कसे मिळणार?



**मदर व अरविंद**

महायोगी अरविंद म्हणतात,

''An Integral knowledge presupposes an litegral reality; for it is the power of a Truth Consciousness, which is itself the consciousness of the Reality.

But, our idea and Sense fo Consciousness, Vary with our status and movement of consciousness, its sight, its stress, its intake of Things; that Sight or stress can be intensive and exclusive or extensive, inclusive and comprehensive.

An integral spiritual consciousness carries in it a knowledge of all the terms of being; it links the highest to the lowest through all the mediating terms and achieves an invisible whole.

At the highest summit of things it opens to the reality, ineffable, because super conscient to all but its own self-awareness, of the Absolute.

At the lowest end of our being it perceives the Inconscience from which our evolution begins; but at the same time it is aware of the one and the All self-involved in those depths, it unveils the secret consciousness in the Inconscience

Interpretative, revelatory, moving between. These two extremes, its vision discovers the manifestation of the one in the Many, The identity of the Infinite in the disparity of things finife, the presence of the timeless Eternal in eternal Time, it is this seeing that illunines for it the meaning of the universe.'' (p.634. Reality and the Integral knowledge 'The Life Divine.')

अरविंद सांगताहेत कीं जर एकात्म पूर्णज्ञान जाणून घ्यायची इच्छा असेल तर त्यांतील प्रथम गृहीतच असे असावयाला हवे कीं असे 'पूर्ण सत्य' कुठेतरी अस्तित्वात असलेच पाहिजे. ही संकल्पना अर्थातच एका तर्कपद्धतीवर आधारली आहे, पण ह्या एका श्रद्धेशिवाय पुढें पाऊलच टाकता येत नाही.

हे 'सत्य' म्हणजेच तोच 'अंतिम पूर्ण सत्याचे' 'चैतन्य जाणीव' (consciouness of the reality)

परंतू आपली स्वत:च्या चैतन्य जाणीवेची कल्पना, आणि जाणीव सुद्धा बदलत असते. आपल्या स्थिती बरहुकुम आणि ह्या चैतन्य जाणीवेत वरचेवर होणाऱ्या बदलाप्रमाणे!! त्यांतील अनुभूती, तीव्रता, विचारांची आवक-जावक, वगैरे. हे सर्व दृष्टीकोन व प्रभाव हे सखोल तीव्र, स्वतंत्र, अंतर्भूत आणि संपूर्ण हवेत.''

पुढील भाष्य ही सत्य जाणीव मिळवण्याची एक विशेष यंत्रणा दाखविते.

''संपूर्ण आध्यात्मिक चैतन्य जाणीवेमध्ये अस्तित्वाच्या सर्व अंगांचे ज्ञान असावयाला हवेच आणि त्यांत उच्चतम व नीचतम टोकांमध्ये संधि करण्याची क्षमता चिंतन व ध्यानधारणा तपस्या यांच्या योगे साधण्याची क्रिया असावयाला हवी. त्यानंतरच अदृश्य संपूर्ण तत्व दृग्गोचर होऊं शकेल.

अत्युच्च शिखरावर 'अवर्णनीय सत्य' आहे- म्हणजेच सगळ्या चैतन्यजाणीवाच्याही वरची श्रेष्ठजाणीव आणि आपल्याच स्वत:मध्ये व परिपूर्ण, निरंकुशा स्थित अशी.

आणि, नीचतम टोकाला आपल्या अस्तिवाच्या सीमेवर दिसेल 'अज्ञानाचा सागर' जेथून आपली उत्क्रांतीची हालचाल सुरू झाली, परंतू त्याच क्षणी जाणवेल तिथे असलेल्या एक आणि अनेक स्वत:च्या अस्तित्वात मग्न व गुंडाळलेल्या खोलवर असलेल्या आत्म्यांचा एक संदर्भ, आणि उलगडेल गुत्प, गूढ चैतन्यजाणीवांचा उगम जो आहे त्या अज्ञान सागरांतला!!

आणि, मगच अर्थ उलगडणारे, साक्षात्कारी असे, दोन ध्रुवांमध्ये भ्रमण, संचार करणारे असे, दर्शन (vision) व त्याचा शोध घडेल. एकामध्ये अनेक, पूर्णत्वाचे इथले म्हणजे अपूर्णातले दर्शन व कालातीतांतील जड सीमित कालाचे अस्तित्वाचे दर्शन!!

ह्या दर्शनाने, ह्या विश्वाचे घडेल, प्रकाश, विमर्श युक्त अशा 'सत्याची जाणीव' व 'अर्थप्राप्ति'!! ( दि लाइफ डिव्हाईन, पान नं ६३४, सत्य व पूर्ण ज्ञान)

**विषयाच्या ज्ञानाचा आदि व अंत :**

आपण संपूर्ण ज्ञानाचा विचार करतो आहोत ना! मग, संपूर्ण याचा अर्थ कुठल्याही विषयाचा '**आदि व अंत**' हा जाणला वा समजला पाहीजे. त्यामुळे 'वृक्ष' हा अभ्यासाचा विषय असल्यास वृक्षाचे बीज त्याच्या भूमि व जल व वातावरण ह्या संसर्गाने बृद्धी नंतर त्याला पाने, फुले येणे व त्यानंतर फळ लागणे हा क्रम होतो. **ह्या फळामध्येच पुन्हा बीज निर्मीती होते, हे नुसते आश्चर्य नव्हें तर ती एक विश्वाच्या कार्यक्रमातील विलक्षण योजना आहे.** त्यामुळे त्या विवक्षित वृक्षाची जात, वैशिष्ट्ये यांचे जतन होते, एव्हढेंच नव्हे तर **त्याची पुन: पुन: निर्मीती होण्याची युक्ती व योजना अंतर्भूत आहे;** आणि, ती अनंत काळापर्यंत चालू रहाते. मग या रहस्याचा शोध **'ह्या प्लॅनचा' मागमूसही आधुनिक विज्ञानाला पूर्णपणे कां लागत नाही? याचे कारण त्या 'शास्त्राची' (भौतिक) मर्यादा. ही सध्याच्या विज्ञान शिक्षणक्रमांत सांगितली जात नाही.**

**वैदिक ज्ञानाचे सामर्थ्य व पूर्णता :**

**पण, याचे उत्तर वैदिक ज्ञानात आहे.** ह्या विश्वाचे दोन मुख्य भाग आहेत. **एक अव्यक्त जग (unmanifest) व दूसरे व्यक्त जग (manifest).** आता हे व्यक्त स्वरूपच फक्त भौतिक शास्त्रज्ञांना उपलब्ध आहे. **जे व्यक्त जगांत आलेच नाही त्याच्याबद्दल ह्या भौतिक शास्त्राला कांहीही ज्ञान मिळवता येणार नाही** ही **'ब्रह्मगांठ'** आहे.

**ती गाठ उलगडण्याची क्रिया फक्त भारतीय संस्कृतीने जपलेल्या वैदिक ज्ञानात पूर्णपणे जतन केली आहे. पण, त्याचे कुतूहल व ज्ञान आज भारतीयांनाच नाही ही मोठी खंत आहे.**

मग हे ज्ञान ज्या पद्धतीने मिळाले ती '**Methodology**' देखील आज अर्धवट ज्ञानात बुडाली आहे. **योग व साक्षात्कारी 'समाधीजन्य' ज्ञानप्राप्ति व पूरक किंवा मुलभूत 'आत्मज्ञान' ही त्याची सूत्रे आहेत.** हे **'आत्मज्ञान'** म्हणजे ज्यांना 'आत्प' म्हणून मान्य करून त्याच्यावर विश्वास ठेवतां येईल. त्याच्याकडून मौखिक, गुप्त संहिता व योगिक क्रिया, तंत्र म्हणजे शरीरातील गुप्त देवता (शक्ती) ह्यांच्या आवाहनाने व स्वत:च्या काँशसनेस, मध्ये, वरच्या अति वरच्या स्तरावर जाणे ह्या सोपान सूत्रक्रिया आवश्यक ठरतील!! त्यांत जी शारिरीक, मानसिक व आध्यात्मिक उन्नतिची लक्षणे सांगितली आहेत, ती कांही 'आदर्शवादी' जड मानवी नैतिक अशी भासली वा दिसली व तशी ती आहेतच, पण तरी देखील त्यांचा संदर्भ केवळ

पृथ्वीवरील समष्टिच्या नात्यांबद्दलची नैतिकता (social Morality) अशी नसून ती ह्या 'unmanifest World' 'अव्यक्त जगाशी ज्ञान मिळवण्यासाठी प्रवेश मिळण्याची आवश्यक यंत्रणा 'Mandartory Scheme' प्रवेश नियम, (accessibility Instrumentality) आहे. अशी स्वच्छ धारणा भारतीय वेगवेगळ्या शास्त्रांत, उपनिषदांत विखुरलेली आढळते. मात्र दुदैवाने आजच्या वेगवेगळ्या शास्त्रांचा सांप्रदायिक अभ्यास वा त्यात अधिकार मिळवणाऱ्या व्यक्तींमध्येही त्याची जाणीव 'एकात्म' (Integral) पद्धतीने अभावानेच दिसते.

हे वैगुण्य फार मोठ्या प्रकारे ह्या भारतीय संस्कृतीच्या अविछिन्न चालण्याऱ्या प्रवाहातील अडचण आहे. आज, ह्या भारतीय संस्कृतीची 'बीज संकल्पना' व प्रवाहाची दिशा व अंतिम हेतू किंवा ध्येये ह्याबद्दल सुस्पष्ट कल्पना अजिबात दिसत नाही. अशा शिक्षणपद्धतीतही आज अस्तित्वात नाही. अशी 'वैश्विक संस्कारात्मक' अंतर्भूत अशी 'योग अंतर्भूत', 'समाधीज्ञान' देणारी संस्था (Institution) जतन करावी अशी समाजाची धारणा नाही. आपल्या राष्ट्र घटनेत (ती Seculer स्वरूपाची आहे) अशी मुळातच विकृत धारणा आहे!!

त्यामुळेच ह्या माझ्यासारख्या लहान माणसाचा हातात घेतलेला एक मौलिक स्वरूपाचा प्रपंच आहे. पण, याला अनेकांचे हातभार लागणे आवश्यक आहे!!

(या लेखाचा पुढील भाग कृपया सप्टेंबर २००८ च्या अंकात वाचावा.)

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,

सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.

Tel. 25368450

E mail;: yrsane@eth.net

•••

| महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय विमान - वाहतूक संस्था | |
|---|---|
| **देश** | **वाहतुक संस्थेचे नाव** |
| नेदरलँड | के.एल.एम.रॉयल एअर लाइन्स |
| कुवेत | कुवेत एअर लाइन्स |
| रशिया | एरोप्लॉट |
| स्वित्झलँड | स्विस्सार |
| ऑस्ट्रेलिया | क्वांटाझ एअर लाइन्स |
| संयुक्त संस्थाने | पॅन अमेरिकन वर्ल्ड एअरवेज |
| पाकिस्तान | पाकिस्तान इंटरनॅशनल |
| थायलंड | थायी एअरवेज इंटरनॅशनल |
| येमेन | येमेन एअरवेज |
| झांबिया | झांबिय एअरवेज |
| सिंगापूर | सिंगापूर एअर लाइन्स |
| फिलिपाइन्स | फिलिपीन्स एअरवेज |
| मलेशिया | मलेशियन एअर लाइन्स |
| जर्मनी | लुफ्तान्सा एअर लाइन्स |

## अजब कहाण्या शोधांच्या

### *कारपेट स्वीपर*

सतरंजीवरील धूळ हवेत न उडवता गोळा करून ती साफ करण्यासाठी अमेरिकेतील मेलविल विस्सेल याने एका झाडूची निर्मिती १८७६ मध्ये केली. पोर्सेलिन पॅकिंग फॅक्टरीत काम करताना त्याला अर्धशिशीचा भयंकर त्रास होई. या असह्य डोकेदुखीचे मूळ कारण म्हणजे पोर्सेलिनच्या वस्तूंचे पॅकिंग करताना वापरण्यात येणाऱ्या गवताचे सूक्ष्म कण होत, हे त्याला ठाऊक होते. ही धूळ हवेत न उधळू देता गोळा करता यावी म्हणून त्याने विशिष्ट प्रकारची कारपेट साफ करणारी केरसुणी तयार केली. व्हॅक्युम क्लीनरचा शोध त्यापुढच्या काळात लागला.

याला जीवन ऐसे नाव

# इस्पितळाचा पहिलाच अनुभव

*वयाच्या ७८ व्या वर्षी दवाखान्यात दाखल व्हायचा प्रसंग येतो, तेव्हा मनात काय वादळे चालू असतील...? एका अनुभवाचे हे वेगळेपण- संपादक*

श्री गणरायाच्या विसर्जनानंतर सगळीकडे नवरात्रोत्सवाची तयारी मोठ्या धुमधडाक्यात चाललेली असते. घराघरातून हा उत्साह ओसंडत असलेला दिसून येतो. पितृ पंधरवड्यात पितरांचे आशीर्वाद घेऊन सर्वजण अंबामातेच्या पूजनासाठी सिद्ध झालेले असतात.

गत वर्षीचा नवरात्रोत्सव माझ्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी देऊन गेला. 'काळ आला होता, पण वेळ आली नाही' ही उक्ती माझ्या बाबतीत खरी ठरली.

चार ऑक्टोबर, गुरुवारी मी नेहमी प्रमाणे भजनाच्या सरावास आले. मी भजनी मंडळांना संवादिनी साथ करते. तर त्या दिवशी सराव करून मोठ्या मुलीकडे आले. विश्रांती घेतली. पण त्यावेळी मला बेचैन वाटू लागले. तेथून माझ्या घरी, अर्थात रिक्षेनेच गेले. पुढील दोन मंडळात गेले नाही. नंतर दोन दिवस थोडी कणकण वाटली. घरगुती औषधे घेतली. पण दिवसेंदिवस ताकत कमी होऊ लागली. दि. ८ ऑक्टोबर, सोमवारी मोठ्या मुलीने मला तिच्या घरी आणले. डॉक्टरांना घरी बोलावले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे सर्व चाचण्या करून घेतल्या. दि. ११-१० रोजी रिपोर्ट घेऊन डॉ. बापटांकडे माझ्या जावयांनी व नातीने मला तपसावयास नेले. E.C.G. वगैरे काढला आणि माझी रवानगी मा. दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये, पुढील तपासासाठी केली गेली.

वय वर्षे ७८. हॉस्पिटलमध्ये जाण्याची ही पहिलीच वेळ. ते सुद्धा एवढ्या मोठ्या नामांकित हॉस्पिटलमध्ये. मी तर भांबावून गेले होते. काय होत आहे आणि काय नाही हे मला कळतच नव्हते. अशा तऱ्हेने आमच्या नवरात्राची स्थापना दवाखान्यात झाली. शुक्रवारची पहाट, ता. १२-१०. घटस्थापनेचा दिवस. मी मनातल्या मनात श्री गणेशस्तवन, देवीचा गोंधळ, जोगवा म्हणत होते. मी माझ्यात राहिले नव्हतेच, तर तिन्ही लोकांत फिरत होते. खरंच त्या प्रसिद्ध गीता प्रमाणे -

तिन्ही लोक आनंदाने भरून जाऊ दे ।<br>
तुझे गीत गाण्यासाठी सूर राहू दे।

तसे त्या संवादिनीचे सूर घेऊन ईश्वरसेवेसाठी परत आले. डॉक्टर सिस्टर्स जे जे उपचार करत होते त्यांना शांत मनाने साथ देत होते. एवढ्या अवधीत माझी मुंबईची धाकटी कन्या पण सेवेला हजर झाली. तिला ४-५ दिवस रहावे लागले.

मा. दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल बद्दल सांगायचे तर, अतिशय स्वच्छ! सर्व व्यवस्था चांगली. त्यातल्या त्यात माझ्या मुलींना तिथला श्री गणेश मंदिर परिसर व कँटिनची व्यवस्था फार आवडली. गरम गरम जेवण नाहीतर अल्पोपहार आणि खिशाला परवडेल अशा स्वरूपात. खरंच, पेशंटला भेटायला आलेल्या व त्याच्या जवळ बसणाऱ्या नातेवाईकाला तिथल्या तिथे खाण्यापिण्याची सोय झाली तर फार चांगले. काही जण बाहेरगावाहून येतात. मग घरच्या गृहीणीला त्यांची सरबराई करायची घरच्यांचे जेवण, पेशंटचा डबा एवढा अटापिटा करावा लागतो, त्यात स्वत:च्या तब्येतीकडे दुर्लक्षच होते. सगळ्यांच्या वेळा संभाळण्यात यात जीव दमून जातो.

पैसा नसणे हा कधीच अडथळा नसतो. कल्पना नसणे हा खरा अडथळा.

तेव्हा, तेथील म्हणजे या हॉस्पिटलमधली ही व्यवस्था फारच चांगली वाटली.

माझ्या उपचारात मला दोन बाटल्या रक्त द्यावे लागेल असे डॉक्टरांनी सांगितले. मी म्हटले, 'मी भाज्यांचे सूप, फळांचा रस, पालेभाज्या खाईन' डॉक्टर म्हणाले, 'आजी, या वयात रक्त भरून येणे कठीण आहे. तुम्हाला रक्ताचा पुरवठा बाहेरूनच करावा लागेल.' त्या गोष्टीलाही मी तयार झाले. सुरुवातीला वाटले कोणाचं रक्त असेल? त्यात दोन दिवस दोन वेगवेगळ्या व्यक्तींचे रक्त आपल्या शरीरात खेळणार. स्त्री, पुरुष, सज्जन, दुर्जन कोणीही असो; पण रक्तदान करणारा पुण्यात्माच तो ! खरोखर रक्तदानाचे महत्त्व त्या दिवशी मला तीव्रतेने जाणवले. मग रक्त देण्याचे सोपस्कार झाले. दोन दिवस रक्त देण्याचा कार्यक्रम पार पडला. त्या डॉक्टरांचे परिश्रम, विज्ञानाची प्रगती व जगदंबेची कृपा या मुळेच मला जीवदान मिळाले. सोमवारी डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवून मंगळवारी १६ तारखेस ललिता पंचमीला, मला हॉस्पिटल मधून पुढील ट्रीटमेंट सांगून घरी पाठवले.

या कालावधीत घरातील नातेवाईकांना, डॉक्टर्सना शारिरिक, मानसिक, आर्थिक त्रास सहन करावा लागला. त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच. ज्यांना येता आले नाही, ते धाकटे जावई, नाती, नात जावई मोबाईल वर चौकशी करत, धीर देत. खरच आधुनिक तंत्रज्ञान किती पुढे गेले आहे. या सगळ्यांच्या मानसिक आधारावर ईश्वर कृपेने मला आता जे 'बोनस' आयुष्य मिळाले आहे ते त्याच्याच सेवे करता भजन, भारूड, सुगम संगीत यांना जमेल तशी जमेल तेव्हा, संवादिनी साथ देत देत घालवायचे, असे मी ठरवले आहे. ''कठीण समय येता कोण कामास येतो'' असे म्हणतात, पण खऱ्या अर्थाने याच काळात खरी परीक्षा होते आणि त्या परीक्षेला जी उतरतात ती 'आपली माणसं'. त्यांना माझे शतशः धन्यवाद.

एक सांगायचे म्हणजे, ही मोठी माणसं किती नम्र असतात त्याचा अनुभव आला. माझ्या सूनबाई डॉक्टरना म्हणाल्या 'तुमच्यामुळे आई वाचल्या' तर त्यांनी उत्तर दिले ''ही सर्व विज्ञानाची किमया !'' खरंच केवढी नम्रता. 'विद्या विनयेन शोभते' याचा प्रत्यय आला. खरं तर डॉक्टरांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व पाहूनच पेशंटला उत्साह येतो, अर्धे दुखणे तिथेच बरे होते. मला भेटलेले तिन्ही डॉक्टर, डॉ. बापट, डॉ. योगेश खरे, डॉ. सौ. मंजिरी वैद्य हे याच प्रकारातील होते. त्या सर्वांना शतशः धन्यवाद !

**श्रीमती निर्मला धारवाडकर**

पुणे

●●●

**महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय विमान - वाहतूक संस्था**

| देश | वाहतुक संस्थेचे नाव |
|---|---|
| फ्रान्स | एअर फ्रान्स |
| कॅनडा | एअर कॅनडा |
| भारत | एअर इंडिया |
| श्रीलंका | एअर लंका |
| इटली | अल् इटालिया |
| मॉरिशस | एअर मॉरिशस |
| बांगला देश | बांगला देश एअरवेज |
| ग्रेट ब्रिटन | ब्रिटिश एअरवेज |
| हाँगकाँग | कॅथे पॅसिफिक एअरवेज |
| इजिप्त | एजिप्त एअरवेज |
| इथोपिया | इथोपिअन एअर लाइन्स |
| इंडोनेशिया | गरूड एअरवेज |
| अमेरिका | ट्रान्स वर्ल्ड एअर लाईन्स |
| आखाती देश | गल्फ एअरवेज |
| जपान | जपान एअर लाइन्स |

ज्ञान पुस्तकात नसते, त्यात व्यक्त केलेल्या अनुभवात व विचारांत असते.

# संत सेना महाराज चरित्र
## लेखांक पहिला

*श्री. शंकरराव मठ यांनी अनेक संतांचा जीवनपरिचय आजवर दिशाच्या वाचकांना करून दिला आहे. या मालिकेतील संत सेना महाराज ह्यांच्या चरित्राचा परिचय करून देणारा हा लेख देत आहोत. - संपादक*

**ख्रिस्तान्द बारावे शतक :**

भारताच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी काळ असेच या शतकास म्हणावे लागेल, बाराव्या शतकात प्रथमतः भारतात मुसलमान राजवट सुरू झाली. येथील राजे या सत्तेपुढे हतबल झाले. परक्यांच्या तडाख्यात देश सापडला, सामाजिक अस्थिरताही वाढली. हिंदु जनतेला कसला आधार असा राहिला नाही. या समाजात नाना पंथ, विभिन्न देव-देवींच्या उपासना, अनेक अनिष्ट रूढी यांचा बुजाबुजाट झाला. जितकी डोकी तितके देव अशी परिस्थिती झालेली पाहावयास मिळते. सत्य काय हे ओळखण्याची मानसिक अवस्थाच नव्हतीं व्रतवैकल्ये, मंत्रतंत्र, अंगारे धुपारे आदी गोष्टींत बहुजन समाज रस घेत होता.

**संतांची कामगिरी :**

अशा दिशाहीन समाजाला दिलासा देण्यासाठी संत मंडळीनी अत्यंत प्रयास केले. याच सुमारास दक्षिण भारतात श्री रामानुजाचार्य यानी श्री वैष्णव पंथाची स्थापना केली. त्यांच्या प्रेरणेतून अनेक शिष्य त्या संप्रदायात निर्माण झाले. त्या पैकी श्री रामानंद स्वामी एक होत. त्यांनी उत्तर भारतात या संप्रदायाचे लोण पोहोचविले. त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. कबीर, गुरुनानक या सारखे लोकोत्तर शिष्य त्यांना लाभले. वाराणशीत राहून प्रचार व प्रसाराचे कार्य रामानंदानी केले.

महाराष्ट्रात भक्ती संप्रदायाचा पाया तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्ञानेश्वर माऊलींनी घातला. त्यानंतर त्यांच्या प्रभावळीतले संत श्री नामदेव व अठरापगड ज्ञातीनिष्ठ संतानी याचा विस्तार केला. संतांनी समाजाला साधा सोपा असा नामस्मरणाचा भक्तिमार्ग शिकवला. श्री रामानंदस्वामींचा आणखी एका विशेष गोष्टीने महाराष्ट्राशी संबंध येतो. आळंदीच्या सिध्दोपंतांचे जावई श्री विठ्ठलपंत यांनी विरक्त होऊन पत्नीची अनुमती ने घेता काशीस जाऊन रामानंद स्वामीं कडून संन्यास दीक्षा घेतली. रामानंद याच निमित्ताने प्रसंगोपात आळंदीस आले. तेथे योगायोगाने विठ्ठल पंतांच्या धर्मपत्नीशी गाठ पडली. तिच्याकडून विठ्ठल पंतांबद्दलची माहिती मिळाल्यामुळे आपणाकडून संन्यास दीक्षा घेतलेल्या शिष्यासंबंधीचा पूर्ण उलगडा झाला. ते माघारी काशीस गेले आणि विठ्ठल पंतांना पुनरपि गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली. यामुळे महाराष्ट्राला निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई अशी चार अलौकिक भावंडे प्राप्त झाली.

रामानंदस्वामींच्या प्रमुख शिष्यांत सेनाजींच्या वडिलांचा देवीदास यांचा समावेश होता. हे रामानंदांचे शिष्य बांधवगडास राहात होते. स्वामींचा मुक्काम तेथे असता देवीदास यांच्या घरी राहत असत. त्यावेळी सेनाजी त्या उभयतांच्या चर्चा ऐकत बसत. स्वामींना याचे आश्चर्य वाटले. त्या बालकाला जवळ बोलावून काही प्रश्न त्यांनी विचारले. त्यांची उत्तरे सेनाजींनी योग्य रीतीने दिली. स्वामींना आनंद झाला. त्यांनी त्या बालकाच्या मस्तकावर हात ठेवून रामनामाचा मंत्र दिला. सेनाजीने विनम्रभावाने गुरू चरणी मस्तक ठेवले. स्वामींनी पुढील काळात रामभक्तीचा प्रचार व प्रसार करण्याचा आदेश दिला.

कितीही पाणी ओतले तरी गळके भांडे कधी भरत नाही.

**महाराष्ट्रात भक्तिमार्गाचा प्रसार :**

बाराव्या शतकात महाराष्ट्रात एका नवीन पंथाचा उदय झाला. चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथ स्थापिला. जातिभेद नष्ट करून श्रीकृष्ण उपासनेकडे अनेकाना वळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तरी देखील हिंदु समाजातील फार मोठा घटक वैश्य व शूद्र व त्यांच्या अठरापगड जाती यांच्यातील विषमता तशीच राहिली.

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात गीता प्रणीत तत्त्वावर अधिष्ठित, भेदभाव विरहित, भागवत धर्माचा पाया संत ज्ञानेश्वर माऊलींनी घातला. त्यांनी आपल्या ज्ञानेश्वरी, अभंगगाथा इत्यादी साहित्या द्वारे संपूर्ण महाराष्ट्र भर भागवत सांप्रदायाची संस्थापना केली. ही भागवत धर्माची वेल अल्पावधीतच विस्तारित झाली. जनमानसात विठ्ठल भक्तीची गोडी निर्माण झाली. त्यातून वारकरी पंथाची मुहूर्त-मेढ झाली. संत बहिणाबाईंच्या या विषयावरील अभंग प्रसिद्ध आहे -

संत कृपा झाली। इमारत फळा आली।
ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।
नामा तयाचा किंकर। तेणे केलासे विस्तार।
जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।
भजन करा सावकाश। तुका झालासे कळस।
बहिणे फडकती ध्वजा। निरूपण केले बोजा।

**सेनाजी व त्यांचा कार्याचा व्याप :**

नामदेव, जनाबाई, चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी हे समकालीन होते. मात्र सेनाजी हे परप्रांतातून आले. महाराष्ट्रभर आपला कायमचा ठसा उमटविला आणि आपल्या प्रांती परत गेले. सेनाजींचे जीवन चरित्र तितकेच उद्बोधक आहे.

सेनाजींच्या कार्याचा व्याप फार विस्तृत होता. सातशे वर्षे उलटून गेली, मात्र भाविक जनांना ते आजही सुपरिचित आहेत. कारण जीवनभर त्यांनी महाराष्ट्र, मध्य भारत, पंजाब, राजस्थान, मारवाड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार इत्यादी प्रांतांत संचार करून महाराष्ट्राखेरीज अन्यत्र रामानंदांच्या रामभक्ती पंथाच्या प्रसाराचे कार्य त्यानी केले. त्यांच्या भक्तांनी स्थापिलेला ''सेना पंथ'' आजही उत्तर भारतात ठिकठिकाणी विद्यमान आहे. काशीत ते राहात त्या मोहल्ल्याला 'सेनपुरा' असे नांव पडले व तिथे या पंथाचे प्रमुख कार्यालय आहे.

महाराष्ट्रीय लोकांना त्यांच्या उत्तर भारतातील कार्याची माहिती नाही. चरित्रकारांनी अनेक विसंगत व परस्पर विरोधी विधाने केली आहेत. इतकी विपर्यस्त माहिती आढळते. त्यांच्या काव्यावरून ते अस्सल महाराष्ट्रीय असावेत असे म्हणावेसे वाटते. महाराष्ट्रातून बरीच कुटुंबे पोटापाण्याच्या निमित्ताने वा भावी उत्कर्षासाठी उत्तर भारतात स्थायिक झाली. आजही इंदूर, ग्वाल्हेर, उज्जैन, जबलपूर, बडोदा आदी शहरांत मराठी माणसे बहुसंख्येने आढळतात. सेनाजींचे पूर्वजही असेच तिकडे गेले असावेत.

**सेनाजींचे जन्मस्थान - बांधवगड :**

इटारसी पासून जबलपूर अहलाबाद रेल्वे मार्ग सुरू होतो. या मार्गावर करती जंक्शन आहे. तेथून एक फाटा विलासपूरला जातो. या फाट्यावर उमाडिया नावाचे स्टेशन आहे. तेथून १८ मैलांवर एक गड दिसतो. हाच तो बांधवगड. आज तो भग्नावस्थेत आहे. सेनाजींच्या जन्मकाळी हा नुसता किल्ला नव्हता, तर ते एक व्यापार उद्योग धंद्याचे वैभवशाली नगर होते. बघेला वंशीय राजाची ती राजधानी होती. त्यावेळी ते राज्य भरभराटीत होते. तेथील राजसैन्यातील सेवकांमधे देवीदास न्हावी यांचे स्थान महत्त्वपूर्ण होते. रोज राजाची हजामत करून त्याच्या अंगाला तेल लावून मर्दन करावयाचे, उटी लावून अभ्यंग स्नान घालायचे या कामावर रामराजांनी त्याची नियुक्ती केली

होती. नाभिक कुळात जन्मल्यामुळे ही कामे त्यांच्या सवयीची होती. देवीदास स्वभावाने सौम्य व धार्मिक वृत्तीचा होता. राजाची नित्यकर्मे करता करता देवीदास त्याच्याशी धर्माच्या विविध पैलूंवर चर्चा करत. त्यामुळे राजाला त्याच्या बद्दल आदर व आत्मीयता होती. देवीदासाचे घर जणू साधुसंतांचे आश्रय स्थान झाले होते.

देवीदास व कुंवर बाई एक मोठे आदर्श दांपत्य होते. साधुजनांचे आगत स्वागत ती आनंदाने करी. रामानंद स्वामी हे देवीदासांचे गुरु. त्यांचा मुक्काम कधी कधी देवीदासांकडे होत असे. त्यांच्या आशीर्वादाने सेनाजींचा रूपात कोणीतरी महापुरुष अवतरला असावा असे वाटे. हळूहळू सेना मोठा झाला. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयाचे ज्ञान प्राप्त करून घेतले. त्याची बुद्धी कुशाग्र व चौकस होती. एखाद्या विषयाचे आकलन त्याला त्वरित होई. वडिलांच्या पारमार्थिक जीवनाचे संस्कार त्यांच्यावर झाले. त्यामुळे बाल वयातच अंत:करणात ईश्वरनिष्ठा दृढमूल झाली. ग्रंथ वाचनाची गोडी लागली. कीर्तन प्रवचन ग्रंथ परिशीलन या द्वारे त्याची चौफेर ज्ञान साधना सुरू झाली. त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या तेजाने लोकांना प्रभावित केले. शिवाय विनम्र भावामुळे लोक त्याच्यावर प्रेम करू लागले. याच सुमारास रामानंद स्वामींचा अनुग्रह पण लाभला.

सेना आता वीस वर्षाचा झाला. तो विवाहबद्ध झाला. पत्नीचे नांव सुंदराबाई असे होते. ती सुशील व आज्ञाधारक होती. देवीदासांनी आपला सारा व्यवहार मुलावर सोपवला. राजसेवाही सेनाला करावी लागली. देवीदास हरिभजनात आपला काळ घालवू लागले. तीर्थयात्रेला जावे असे त्यांना खूप वाटू लागले. महाराष्ट्रात जाण्याची इच्छा त्यांना झाली. सेनाला ते म्हणाले, पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचे दर्शन करून जीवनाचे सार्थक करावे असे मला फार वाटते. माझा गुरू-बंधु विठ्ठलपंत आळंदीला असतो. त्याच्या मुलाने मोठे नाव कमवले आहे, असे म्हणतात. त्या कुटुंबाला भेटण्याची इच्छा झाली आहे. रामराया काय करील ते खरे. सेना म्हणाला, आपली प्रकृती ठीक झाली म्हणजे एकदा तिकडे जाऊन या.

**देवीदासाचा अंत :**

दुदैवाने देवीदासांची प्रकृती दिवसे न् दिवस ढासळत चालली. अंतकाळ जवळ आल्याचे पाहून त्यांनी सेनाला जवळ बोलावले आणि म्हणाले, माझे स्वप्न अपुरेच राहिले. तू एकवार महाराष्ट्रात जाऊन माझी इच्छा पुरी कर. सेनाजीची मूक संमती मिळाल्यावर देवीदासाचा आत्मा अनंतात विलीन झाला. त्यांच्या निधनानंतर त्यांनी सोपविलेली सर्व कामे अत्यंत निष्ठेने सेनाजीनी केली. पतिपत्नी आल्या गेल्यांचे आदरातिथ्य करत असत. साधुसंतांचा राबता नित्यच त्यांच्या घरी असे. या यात्रेकरूत महाराष्ट्रातील लोक असत. त्यामुळे तेथील थोडीफार माहिती सेनाला होत असे.

राजाराम राजे परलोकवासी झाले. युवराजवीर सिंह गादीवर बसले. हा तरुण राजा. न्यायी व शिस्तप्रिय होता. तितकाच कडक वृत्तीचा व भडक माथ्याचा होता. एकच वैगुण्य होते तो स्तुतिप्रिय होता. वीरसिंहाला कुष्ठरोग झाला होता. ही गोष्ट सेना व त्याची राणी यांनाच माहीत होती. अंगावर चट्टे उठू लागले. गुपचुप औषधी उपाय चालू होते पण रोग हटत नव्हता.

सेनाजी आपले काम नेमाने करत. काम संपल्यावर धोकटी ठेवून देत. स्नान करीत व शुद्ध होत. ते म्हणतात,

ऐका स्वधर्म विचार। धंदा करावा दोन प्रहर।<br>
सांगितले साचार। पुराणन्तरी ऐसे हे।<br>
करुनिया स्नान। मुखी जपावा नारायण।<br>
मागुनी पुन: जाण। शिवू नये धोकटी।

दुपारच्या वेळी संत वाङमयाचा अभ्यास, चिंतन, अध्ययन, स्वरचित अभंग पदे आदींचे लेखन असा भरगच्च कार्यक्रम असे. शिवाय मंदिरात भजन कीर्तनाचा कार्यक्रम

असे. असा लोकजागरणाचा कार्यक्रम चालू होता. हरिदास, साधु संत येत असत. त्यावेळी दैनंदिन कामातही खंड पडे. कधी राजसेवेलाही विलंब होई.

**महाराष्ट्रात :**

वडिलाना अंतकाळी दिलेले वचन, येणाऱ्या जाणाऱ्या महाराष्ट्रीय साधुसंताकडून तेथील सुधारणे बद्दल ऐकिवात येणारी महिती, भक्तीचे केंद्रस्थान पंढरपूर बघण्याची इच्छा, यामुळे तिकडे जाण्याची तीव्र उत्कंठा लागली. देव कृपेने त्यांना अशी संधी प्राप्त झाली.

एकदा सेनाजींकडे साधु संतांचा मेळा आला. त्यांची व्यवस्था करण्यात सेनाजी मग्न झाले आणि राजसेवेची वेळ टळून गेली. राजांनी निरोप धाडिला. मात्र लगेच जाणे त्यांना जमले नाही. राजाने त्याला कैद करण्याकरता शिपाई धाडले. इतक्यात खाकेला धोकटी अडकविलेले सेनाजी उभे ठाकले. राजाने शिपयाना परत बोलाविले. 'संत मंडळी आल्यामुळे आपल्या सेवेला येण्यास मात्र उशीर झाला. महाराजांनी क्षमा करावी.' असे सेनाजी म्हणाला. राजा शांत झाला. नेहमी प्रमाणे हजामत उरकून अंगाला तेल लावले व मर्दन केले त्याचा तो स्पर्श राजाला अत्यंत सुखद वाटला. राजाच्या ध्यानात आले की आपल्या अंगावरचे डाग नाहीसे होऊन कातडी नितळ झाली आहे. राजा खूष झाला. पसाभर सुवर्णमुद्रा देऊन त्याला निरोप दिला.

इकडे खरा सेनाजी संत लोकांची व्यवस्था करून धावत पळत राजाकडे आला. राजा त्यांचाकडे पाहातच राहिला. इतक्यात हा येऊन गेला पुन: त्याच कामासाठी का आला. राजानी सेनाला सारे निवेदन केले. सेना आश्चर्य-चकित झाला. राजाने धोकटी उघडून बघावयास सांगितले पाहाताच अगदी खरोखर सुवर्ण मुद्रांनी ती धोकटी भरलेली दिसली. हे सारे पांडुरंगाचेच कार्य आहे. राजाला सेनाजी म्हणाले, राजा, तू भाग्यवंत आहेस. माझ्या रूपात तू साक्षात पांडुरंग पाहिलास, मी मात्र कमनशिबी की त्याला त्रास दिला. आता राजाला उलगडा झाला. सेनाचा अधिकार मोठा असल्याचे राजाच्या ध्यानात आले. राजाने त्याला दंडवत घातले व अनुग्रह करण्याबद्दल विनवले. सेनाने अनुग्रह केला व संसारत्याग करून तीर्थयात्रेस जाण्याचे जाहीर केले. बायको व मुलगा यांचा प्रतिपाळ कर असे राजाला सांगून सेना निघाला. राजाने त्याला असे न करण्याबद्दल विनविले. पण सेना निश्चयापासून ढळला नाही. महाराष्ट्रात जाण्याचा त्याचा निर्धार पक्का झाला.

**श्री. शं. बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

●●●

(पान १० वरून)

उपदेश आणि देवताप्रार्थना असे विधी सामान्यत: असतात. ह्या एवढ्या विधींच्या परिपालनाने विवाहकार्याला संपूर्णता येते. ह्या प्रमुख विधींखेरीज अक्षत, घाणा भरणे, साखरपुडा, उष्टी हळद, गडगनेर (केळवण), तेलसाडी व तेलफळ, रुखवत, आंबवण, वराचे रूसणे, सुनमुख, व्याहीभोजन, रासन्हाणे, विडे तोडणे, रंग खेळणे, झेंडा नाचविणे वगैरे लौकिक आचारप्राप्त विधी विवाहसमारंभात असतात. त्याचप्रमाणे पुण्याहवाचन, नांदीश्राद्ध, मंडपदेवतास्थापन, वाग्दान, सीमांतपूजन, ऐरिणीपूजन वगैरे विधी संस्कार धर्मप्राप्त म्हणून करावे लागतात. ह्या सर्व लौकिक किंवा संस्कारनुषंगिक धार्मिक विधींचा उद्देश विवाहसंस्कारांतील मांगल्य वाढविणे, शुभत्व अभिवर्धित करणे, कल्याणकारक संकल्पाची व्याप्ति वाढविणे, निर्विध्नता संपादन करणे असेच असल्यामुळे त्या सर्वांची आवश्यकता आहेच.

कै. कृ. वि. सोमण

(कुर्यात सदामंगलम या पुस्तिकेवरून सभार)

# गोवा सहलीचा बेत

*गोव्याच्या सहलीला जाण्याचं संयोजन करण्याच्या निमित्ताने आपल्या चमूतील मित्रांना लिहिलेल हे छोटसं माहिती पत्र. त्यातील गोव्याचं वर्णन कुठं तरी 'चला, गोव्याला जाऊ' असा हट्ट करत मनात येतं . . . संपादक*

'ऋतुचक्र'--- आणखी एक करवट बदलतं. कोजागिरीच्या चंदेरी - राती---'धुंद - फुंद' वातावरणाची एक आगळीच 'झिंग' अनुभवायास येते.

उबदार रंगातल्या गुलाबी स्वप्नांची---पिवळ्या शालूवर पिंगा घालणाऱ्या हिरव्या-कंच राघूंच्या-त्या थव्याची --- याद चाळवते! नि वाटू लागतं --- जे वाटू लागतं ते --- पोटातलं ओठावर येतं --- समेवर टाळी मिळते --- 'तार' जुळते ---

हे वाटण आम्हांस का नवीन आहे? --- या वाटण्यांतूनच नाही का --- आम्हांस पालीचा गणराया पावला --- पोखरणचा वन-विहार, शिवाय लेण्याद्री, ओझर, भीमाशंकर, देहू, आळंदी, पुणं, अजंठा-वेरूळ-दौलताबाद, घृष्णेश्वर नि खंडाळ्याचा वन-विहार! --- वगैरे --- वगैरे!

पण आता जरा कुठे तरी लांब--- दूर। --- जाऊ या। परदेशाची वारी नाही तरी निदान 'पर-प्रांतावर' स्वारी करू या यंदा! गोवा-गोवा का आम्हांस परका? परप्रांत? आम्ही ठाणेकर - इतिहास विसरलो तर! तो स्वयंभू कौपिनेश्वर, तो मासुंदा तलाव, यांची प्राप्ती आम्हांस कशी नि कधी झाली? पोर्तुगीज, फ्रेंचांनी इंग्रजानी या देशाची आपसांत वाटणी केली. फिरंग्यानी गोव्यापासून साष्टी-तालुक्या पर्यंतचा भाग कबजाखाली आणला. पहिल्या बाजीरावाचा भाऊ चिमाजी-अप्पा! यानं पुण्याहून स्वारी करून या फिरंग्यानी गोव्यापर्यंत पिछेहाट केली. स्वारीनं वाटेत घोड्यांना पाण्यासाठी 'तलाव' खोदला तोच ठाण्याचा मासुंदा-तलाव! तलाव खोदतांना सापडलेली शंकराची पिंड तो आमचा कौपिनेश्वर! ठाण्यातला भुईकोट किल्ला बांधला पोर्तुगिजांनीच. सांगायचा मुद्दा हा की या फिरंग्यानीच आमचा गोवा आम्हांस पारखा केला.

ज्या निसर्गरम्य भूमीच्या दर्शनास आपण जात आहोत त्या भूमीवर काल-पर्यंत फडकत असलेलं फिरंगी-निशाण; नि त्या भूमीच्या स्वातंत्र्यासाठी आपण दिलेला 'मुक्तीसंग्राम'! नि या संग्रामाशी निगडित असलेली राममनोहर लोहिया, सेनापती बापट, सुधाताई जोशी - ही नी अशी अनेक नावे आजही आपणांस आठवत असतील. या सर्वांचे स्मरण उजळणारा -- तो अग्वादचा किल्ला आपण पहाणार आहोत. -- गौतमाचा शांती-संदेश पसरविणारे आचार्य धर्मानंद कोसंबी, राण्यांच्या बंडाचे नि धर्मांध पोर्तुगीजांच्या धार्मिक छळाचे इति-वृत्त देणारे प्रिन्सिपल अ.का.प्रियोळकर, आपल्या वाङ्मयातून कोकणच्या नि विशेषतः गोव्याच्या भाव-जीवनाची ओळख करून देणारे महादेव शास्त्री जोशी, आमचेच कवी बा.भ. बोरकर, रंगेल कांदबऱ्या प्रसवणारे चंद्रकांत काकोडकर.

मंदिरे! दक्षिणेतील मंदिरांचा लौकिक मोठा! गोव्यांतली मंदिरे!-- त्या दक्षिणेतील मंदिरांप्रमाणेच स्वच्छ नि सुंदर! गोयेकरांच्या त्या दैवतांचे मंगेश; शांतादुर्गा, रामनाथ, म्हाळसा आदींचे दर्शन घ्याल तेव्हा आपणास खाचितच जाणवेल-- आपल्या श्रद्धेला हे 'आव्हान' आहे नि अवाहनही आहे! या दैवतांपुढे अहोरात्र जळणाऱ्या 'नंदा-दिपा' प्रमाणेच चाललेली अभिजात संगीताची अखंड नि अव्याहत साधना! - रियाज- नि त्या साधनेचे साक्षीदार असलेली ती दैवते! - आपल्या चित्तवृत्ती हेलावून

सोडतील. आपल्या न कळत आपण नतमस्तक व्हाल - - आणि कुणास ठाऊक त्या मैफलीत रंगून ही जाल.

नागपूरपासून गोव्यापर्यंत पसरलेला माझा महाराष्ट्र! अहिराणी व मालवणी प्रमाणेच असलेली माझी कोकणी! नि ती बोली बोलणारे 'आमचं गोयं', ज्या गोव्यांनं माझ्या मराठी रंगभूमीची ही 'शान' वाढवली ते आमचं गोयं! बघायला आम्ही निघत आहोत. आम्ही जाणार त्या वेळी 'आंबे-फणस' नसणार. दिवाळी संपली की, म्हणजे २० नोव्हेंबरच्या शनिवारी, सकाळी ८ः४५ वाजता मुंबईहून सुटणाऱ्या कोयना एक्सप्रेसने आम्ही गोव्यासाठी प्रस्थान ठेवणार. गोव्यांत, मडगांवला पोहोचेपर्यंत २१ ची म्हणजे रविवारची सकाळ उजाडेल. तेथून मग टुरिस्ट बसनं फार्मा-गुडी! तेथल्या टुरिस्ट कॉटेजस सुंदर-निसर्ग वातावरणांत आहेत. तेथेच आपला मुक्काम!

गोव्यातलं स्नेहशील, सौजन्यपूर्ण थोडंस उमरावी तोऱ्यांतल 'सारस्वती' अतिथ्य खचितच आपल्याला भुरळ पाडील. ती 'सोलकढी', खोबरेल तेलांत तळलेली ताजी मासळी नि त्या ताज्या मासळीचंच (विशेषतःबांगड्यांच!) नारळाच्या दुधा-भरलं ते कालवण, ती चवळीची उसळ नि तो पाव! हे सारं, सारं आपल्या जिव्हेचे लाड नक्कीच पुरवील.

गोव्याचा समुद्र किनारा! जगातील प्रवाशांचं खास आकर्षण! नागरी जीवनाच्या कृत्रिमतेला मन विटंल, म्हणजेच हा निसर्ग चार दिवसांकरिता का होईना जवळ करावा. हा वेडा निसर्ग आपल्याला वेढून टाकील, मोहीत करील, वेड लावील. पण! पुन्हा --- पण काय? नाही इथं फिरताना फेरफटका करताना जरा जपून, म्हणजे तसं काही नाही, तरी पण! म्हणजे काय की दूर तिथं (वा जवळही!) रेंगाळणार एखाद (अ) लौकिक! म्हणजे काय की नजरेआड व्हावं म्हटंल तरी होत नाही नि मग? पणजी पासून मार्मा गोव्यापर्यंत तो समुद्र, ती पुळण, ती मांडवी, ते डोंगर नि त्या दऱ्या, ती मंदिरं नि ते सेंट झेविअरचं चर्च नि कॅथेड्रेलमधल्या सुवर्ण घंटा! ती हिरवीगार शेतं, ते माड नि त्या आंबराया, माडाआड लपलेली ती घरं-कोलारू! तांबड मातीनं रंगलेल्या त्या वाटा नि ते रस्ते! हे सारं पहाणं! हिंडणं!! नि खाणं!!! या चार पांच दिवसांत आपण सारे ती नागर वस्तीतील सिमेंटची झाडं नि जंगलं! नी दूषित हवा, प्रदूषित पाणी!

सारे विसरून जाऊ या!

निसर्गाच्या या लाडक्या 'लेकराशी' जवळीक साधू या! निघालो कुठून! पोहचलो कुठे!

याचं भान हरपून . . .

पंचवीसचा तो 'गुरुवार' उजाडेल, नि दूर किनाऱ्याला नांगर टाकून आपलीच वाट पहात असलेल्या त्या अग्नीनौके कडे आपली जड पावलं जेव्हा वळतील तेव्हा कदाचित आठवेल ---

माझी आगबोट कंपनी (खूप खूप वर्षांपूर्वीची)

तिची जाहिरात करणारे ते गाणं -

माझी आगबोट चालली!

दर्यातनं! दर्यातनं! दर्यातनं

मन धावत चंचलं --- असचं काहीतरी

**श्री. अनिल हजारे**

देवबाप्पा सोसायटी, खारकर आळी,
ठाणे ४००६०१.
दूरध्वनी - २५४११०१९

●●●

नदी आपले पाणी महासागरात ओतते, पण ते पाणी परत येत नाही.

पुस्तक परिचय

# 'ओ पी नैय्यर आणि मी'
## (वाचनीय, संग्राह्य पुस्तक)

प्रचंड निराशेच्या हताश करणाऱ्या क्षणी मनाला आधार देणारे, उभारी देणारे संगीत म्हणजे काय असते हे कळण्यासाठी व्यक्तिमत्त्वात एक झपाटलेपण हवे असते. काळ्याकुट्ट आत्महत्त्येच्या विचारांचे ढग मनात जमतात तेव्हा जुनी हिंदी गाणी जो आधार देतात त्याला कोणती तुलना असू शकेल? ओ. पी. नैय्यर या साडेपाच अक्षरांच्या नावात आणि हे नाव धारण करणाऱ्या संगीतकारात ही ताकद होती. ऊसासे सोडत विरह जगतांना, सहवासातले क्षण साजरे करतांना, खोल गर्तेत कोसळताना ओपींचे संगीत असणारी आशा - रफीच्या अजरामर गाण्यांची दुनिया होती, म्हणून निभावून गेलो, हा आमच्या पिढीचा जिवंत अनुभव आहे.

२८ जानेवारी २००७ रोजी ओपी अनंतात विलीन झाले हे खरे, पण त्यांच्या संगीताचे, गाण्यांचे गारुड निदान आमची पिढी आहे तोवर रहाणार आहे. योगायोगाने आमच्याच पिढीतील प्रल्हाद आवळसकर यांनी आमच्याच भावभावनांना शब्दरूप दिलेले अप्रतिम असे 'ओ. पी. नैय्यर आणि मी' वाचनात आले आणि ओपींच्या संगीतातले क्षण मनात जिवंत झाले.

ओपी ठाण्यात रहायला आले हे समजल्यावर त्यांच्या पाया पडून तरी यावे असे वाटत राहिले. 'ठाण्यात ओपी' या कल्पनेमुळे ठाण्याचेही कौतुक वाटायला लागले पण त्यांना प्रत्यक्ष पहाणे जमले नाही. आवळसकरांना मात्र ते साधले. झपाटलेपणाने, ओपींच्या सहवासातले काही क्षण त्यांना मिळाले. श्री. नाखवांकडे ओपी होते. ओपींना भेटायचे कसे या प्रश्नाचा व्यूह आवळसकरांना छेदता आला आणि मुख्य म्हणजे ओपींच्या चालीवर जगता जगता आठवणींचे क्षण शब्दांकित करता आले. आवळसकर खरे ओपी भक्त आणि नशीबवान भक्त.

'ओ. पी. नैय्यर आणि मी' हे त्यांचे पुस्तक अनेक दृष्टींनी व अनेक कारणांसाठी वाचालयाच हवे असे पुस्तक झाले आहे. रुढ अर्थाने हे ओपींचे चरित्र नाही, तरीही ओपींच्या ध्यासपर्वाचे, स्मृतिबंधाचे अतिशय झपाटून टाकणारे शब्दांकन यात आहे. लेखक प्रल्हाद आवळसकर यांच्या बालपणाच्या दिवसांत त्यांच्या जाणीवांत आलेले ओपी. त्यांच्या वाढीचा अपरिहार्य भाग बनलेले ओपी आणि अचानकच दर्शन घेता आलेला हा त्यांचा देव हे आवळसकरांनी अतिशय प्रभावी पद्धतीने मांडले आहे.

काकरतळा, महाड, श्रीवर्धन येथील बालवयापासूनच लेखक ओपींच्या संगीताने झपाटून गेले होते. 'मांग के साथ तुम्हारा' या गाण्याने 'ओनरशिप बेसिसवर' (पृ. ९) ओपी लेखकाच्या मनात, भावविश्वात स्थिरावले ते कायमचे. आवळसकरांचे मराठी औपचारिकतेचा ताण न घेता अनौपचारिक बाजाने पुस्तकात येते त्यामुळे अपालेसे वाटते आणि थेट मनात शिरते. 'ओनरशिप बेसिसवर' ओपी मनात येणे, कुठल्याशा 'खटमल थेट्रात' (पृ. १७) सिनेमा पाहणे, बारा वर्षांचे असताना लेखक जेव्हा साडेसातीचे चटके सोसतात त्यावेळी नैय्यर, आशा - रफींचा आधार 'दुखदबाव बनून' (पृ. ५४) त्यांच्या अनुभवास कसा येतो, 'परिवर्तनही संसारका नियम है' (पृ. १११) हे सांगताना लेखक आपल्याजवळ बसून बोलल्यासारखे वाटते हे ओपींचे रूढ अर्थाने चरित्र नाही, पण आवळसकर कुळातील 'भगत प्रल्हाद' (ओपींचे शब्द) त्यांच्या चरित्रातील होतेच.

अर्थात त्यात सुसंगत अशी कालबद्धता नाही. असा सूत्रबद्धपणा नसल्याने ओपी समजायला पुस्तक अधिक चांगले झाले आहे. अखेरच्या दिवसांत वयाची आठ दशके पार केलेले ओपी फिलॉसॉफिक होतात. अनेक बऱ्यावाईट आठवणी, त्यातील अन्वयार्थ उलगडून दाखवतात ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. 'चैन से हम को कभी...' या गाण्याची आठवण उदाहरणादाखल सांगता येईल. आशा आणि ओपींच्या लाँग असोसिएशनची अखेर (पृ. १२७) हा किस्सा कलाकार आणि माणसातील सीमारेषेवर पुन्हा विचारात टाकतो. फलज्योतिष जाणणारे, होमिओपॅथी ओपी स्वत:चीच पत्रिका फाडतात. 'आपले काम जीव ओतून करावे.' इतके साधे तत्त्वज्ञान मांडतात. हा सर्व भाग मुळातून वाचायलाच हवा असा आहे.

रुढ अर्थाने चरित्र नसले तरी वर म्हटल्याप्रमाणे सहवासातील आठवणींचे, प्रसंगांचे चरित्रांकन आहे. त्यामुळे ओघ ही शैलीची गरज आहे. आवळसकरांचे लेखक म्हणून असणारे हे ओघवत्या शैलीचे वैशिष्ट्य आवर्जून मान्य करावे लागेल. तसेच के. एल. सैगलच्या गाण्यातून घडलेल्या ओपींची कारकीर्द पृ. १५७ - १९४ या दरम्यान तपशीलाला येते यामुळेही पुस्तकाचे संग्रहमूल्य वाढले आहे. १६० ते १९४ या पानांतील गीतसूची तर महत्त्वाची भर आहे. लताला बरोबर न घेताही संगीतात झंझावाती काम करणारा हा संगीतकार. १९५२ ते १९७३ हा त्यांचा खरा काळ. हा काळ पुन्हा परतून येणार नाही हे चित्रपट संगीताचे दुर्दैव !

प्रल्हाद आवळसकरांच्या 'ओपी नैय्यर आणि मी' या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर ओपींच्या आठ मुद्रा आहेत. नेहा जोशी यांनी मुखपृष्ठ आकर्षक बनवले आहे. प्रतिक प्रकाशनाने मराठीत प्रकाशित केलेले हे पुस्तक हिंदी, इंग्रजीतही यायला हवे. एका हृदयस्थ संगीतकाराच्या आठवणींना इतका चांगला उजाळा दिल्याबद्दल आवळसकरांचे खास आभार.

**ओ.पी.नैय्यर-एक अनोखी भक्तिगाथा :**

ओ. पी. नैय्यर यांच्यावरील आगळ्यावेगळ्या पुस्तकाचा विशेष परिचय देत आहेत. ओपी-आशा-रफी या त्रिकुटाच्या संगीत कर्तृत्वाची जाण असलेल्या, हिंदी चित्रपटगीतांच्या स्मरणरंजनात आनंद शोधणाऱ्या रसिकांना हे पुस्तक म्हणजे अनोखी ठेव आहे.

ओपींच्या शेवटच्या काळात, नातेवाईकांपासून स्वत:ला अलग केल्यानंतर ते ठाण्यात रहायला होते. ज्योतिषाचा अभ्यास असणारा आणि होमिओपॅथी औषधांचे उपचार करणारा हा संगीताचा बादशहा भूतकाळ विसरून ठाण्यात जगू पहात होता. त्या शेवटच्या दिवसांत प्रल्हाद आवळसकरांनी त्यांच्याशी साधलेला हा संवाद आहे. त्या अखेरच्या दिवसांत ओपींना भेटून त्यांचे चरित्र लिहिण्याचा लेखकाचा हेतू होता. तो साध्य न होता रूढार्थाने चरित्र नसलेली ही भक्तिगाथा तयार झाली. होते ते चांगल्यासाठी. भक्तिगाथा हा शब्द आम्ही हेतूपूर्वक वापरत आहोत. 'भगत प्रल्हाद' हे आवळसकरांसाठी ओपींनी वापरलेले संबोधन होते व पुस्तकभर या भक्तीचाच आविष्कार आहे.



ठाण्यात हाताच्या बोटावर मोजावीत इतकीच चांगली पुस्तके लिहिली जातात, प्रकाशित होतात. संख्या कितीही असली तरी दर्जा महत्त्वाचा आहे. हे सत्य मान्य केल्यास अशा हाताच्या बोटावर मोजाव्यात अशा पुस्तकांच्या यादीत हे पुस्तक आले आहे. ओपींनी संगीत दिलेल्या गीतांचा व त्यांच्या संगीतशैलीचा गीतनिहाय अभ्यास करून आवळसकरांनी पुढील पुस्तक सिद्ध करावे. या पुस्तकातून त्यांनी तो अधिकार प्राप्त केला आहे.

- 'ओपी नैय्यर आणि मी'
- श्री. आवळसकर प्रल्हाद, पुणे,
- प्रतीक प्रकाशन, २००७,
- पृ. १९४ मूल्य रु. १८०/-

•••

## आद्यगुरु शंकराचार्य यांची स्तोत्रे

### (नित्य पठणासाठी उपयुक्त पुस्तक)




श्रीमत् आद्य शंकराचार्य

हिन्दु परंपरेत स्तोत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक स्तोत्रांतील अक्षर न् अक्षर सिद्ध मंत्राप्रमाणे प्रभावी आहे असे नित्यपठण करणारांचे अनुभव आहेत. माणसाला अखंडपणे स्फूर्ती देणारे प्रेरणा स्त्रोत म्हणजे स्त्रोत्रे असेही सांगितले जाते. पुराणकाळापासून अनेक स्तोत्रांनी भारताचे आध्यात्मिक साहित्य संपन्न केले आहे. याज्ञवल्क्य ऋषींनी रचलेली स्तोत्रे, नारद पुराणातील स्तोत्रे इ. अनेक स्तोत्रे जशी आजही श्रद्धाभावाने म्हटली जातात, नित्य पठणाने सरावात असतात, तशीच आद्यगुरू श्री शंकराचार्यांची अनेक स्तोत्रेदेखील आज नित्य पठणात असावीत.

भारतीय वैदिक साहित्याचा व्यासंग असणारे, आध्यात्मिक साहित्याचा अभ्यास असणारे शंकरराव मठ यांनी श्रीमत आद्य शंकराचार्यांच्या २२ स्तोत्रांचे पुस्तक लिहून स्तोत्र साहित्यात मोलाची भर टाकली आहे. (कै.) व. दि. कुलकर्णी यांच्या प्रेरणेने शंकराचार्यांचे चरित्र व तत्त्वज्ञान शंकरराव मठ यांनी लेखमालेच्या रूपात प्रथम लिहिले. नंतर त्याचे पुस्तक काढले गेले. त्याच कामाच्या प्रेरणेतून पुढे श्री. मठ यांच्या संग्रहातील काही प्रकाशित स्तोत्रे एकत्र करून हे पुस्तक सिद्ध झाले.

२२ स्तोत्रे असलेल्या या पुस्तकाची रचना अतिशय सुगम आहे. स्तोत्रातील मूळ श्लोक, त्याचा अर्थ, आवश्यक तेथे विवरण व विशेष माहिती या टप्प्यांनी पुस्तक लिहिलेले असल्याने ज्ञान आणि भक्ती यांचा सुंदर मिलाफ झाल्याचे जाणवते. केवळ अर्थ दिला असता तर हे साधले नसते.

माया पंचकम् या स्तोत्राचे (पु. ३९ ते ४१) उदाहरण पाहता येईल. स्तोत्राला सुरूवात करण्यापूर्वी शंकरराव मठ थोडक्यात माया या शब्दाचे विवरण करतात. त्यानंतर या पंचकातील पांच श्लोक सार्थ दिलेले आहेत. अर्थाची भाषा जितकी सोपी करता येईल तितकी केली आहे. त्यानंतर पुन्हा या पांच श्लोकांतील आशयाच्या अनुषंगाने विवरण

येते.

याप्रमाणेच, सुरूवातीलाच येणाऱ्या प्रात:करणाच्या श्लोकांबाबतही त्यांनी विस्ताराने पण महत्त्वाची अशी जी माहिती नमूद केली आहे तिचा उल्लेख करता येईल. पुस्तक परिचयाच्या स्थलांअभावी सर्वच स्तोत्रांबाबत तपशिलात लिहिता येणार नाही. पण एक आवर्जून सांगायला हवे की स्तोत्र (परमेश्वराची स्तुती) हे पठणाचे साहित्य आहे. सततच्या व मोठ्या आवाजात केल्या जाणाऱ्या पठणातून मनावर, वाणीवर होणारे संस्कार आणि निर्माण होणाऱ्या लहरींतून वस्तूंवर होणारे संस्कार लक्षात घेता ही स्तोत्रे लहान वयापासूनच पालकांनी आपल्या पाल्यांकडून पाठ करून घ्यायला हवीत.

या पुस्तकाचा विशेष म्हणजे ही दुसरी आवृत्ती आहे. याचा अर्थ पहिली आवृत्ती वाचकांपर्यंत पोहचून मागणी अजूनही आहे हे चांगले म्हणावे लागेल. घराघरांत हे पुस्तक पालकांनी ठेवून यातील स्तोत्रांचे पठण आपल्या नित्यक्रमात आणले पाहिजे.

पुस्तकाच्या प्रारंभिक पृष्ठांत शंकराचार्यांचे संक्षिप्त चरित्र दिले आहे हे ही लक्षात घ्यावे असे आहे. या पुस्तकाची उपयुक्तता आणखीन वाढावी या दृष्टीने पुस्तकाला परिशिष्टे हवी होती असे जाणवले. या स्तोत्रांत आलेल्या काही आध्यात्मिक संज्ञा, संकल्पनांचे स्पष्टीकरण, संदर्भासाठी वापरलेल्या ग्रंथांची सूची, शंकराचार्यांच्या पुस्तकात समाविष्ट नसलेल्या स्तोत्रांची सूची अशाप्रकारची काही परिशिष्टे या पुस्तकात आवश्यक आहेत. विरेंन्द्र तिखे यांनी बनवलेले मुखपृष्ठ (श्री. शंकराचार्यांचे छायचित्र) पुस्तकाला साजेचे आहे. मलपृष्ठावर श्री. शंकररावांचा सचित्र परिचय दिलेला आहे ही बाब महत्त्वाची आहे. श्री. मठ यांच्या ग्रंथसंपदेतील विविधता व त्यांचा वेद उपनिषदांचा अभ्यास याची वाचकाला त्यामुळे कल्पना येऊ शकते. अधिकारी अशा अभ्यासक्रमाने लिहिलेले हे पुस्तक या सर्व दृष्टींनी महत्त्वाचे ठरते.

- श्रीमत् आद्य शंकराचार्य यांची निवडक स्तोत्रे
- लेखक - शंकर बाळकृष्ण मठ
- अरविंद प्रकाशन, ठाणे
- आवृत्ती - दुसरी २००८,
- पृष्ठे - १०२,
- मूल्य - रु. १००/-

**प्रा. मोहन पाठक**

●●●

## अजब कहाण्या शोधांच्या

### *च्युइंग गम*

च्युइंग गम चघळण्याची सवय ही मुलांप्रमाणे मोठ्या माणसालाही दिसते. तंबाखू सेवन व धूम्रपान यांना पर्याय म्हणून अमेरिकेत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस च्युइंग गमचा वापर करण्यात येऊ लागला. टॉमस ॲडम्स याने चिकल या डिंकासारख्या पदार्थापासून च्युइंगमची निर्मिती केली. १८७२ मध्ये ॲडम्सने त्यासाठी स्वत:ची संस्था स्थापन केली आणि च्युइंग गमचे उत्पादन व वितरण व्यापारी तत्त्वावर सुरू केले. च्युइंग गमचा शोध योगायोगानेच ॲडम्सला लागला. तो रबर बनवण्यासाठी लागणाऱ्या लॅटेक्सला पर्याय शोधण्याच्या दृष्टीने संशोधन करत होता. त्या प्रयत्नात त्याला च्युइंग गमचा शोध लागला.

# देव देहीच पाहावा

*याचि देही, याची डोळां 'देव' पाहायचा असेल तर, अनुभवायचा असेल तर आपल्या कर्माचा धंडोळा घेत रहा. आपले 'पुण्य' किती आहे याचा विचार करा. हा आशय सांगून आत्मपरीक्षणास प्रवृत्त करणारा हा लेख - संपादक*

जीवन रुपी संसारामध्ये आज प्रत्येक व्यक्ती भौतिक साधनसंपत्तीद्वारे सुख, शांती आणि समाधान मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे. भौतिक साधनांद्वारे जर मानवाला सुख, शांती मिळत असेल तर अनेक व्यक्ती आध्यात्माकडे का वळतात? आणि जर आध्यात्माद्वारे संसारात सुख, समाधान मिळत असेल तर व्यक्ती भौतिक साधनांच्या मागे का लागतात? हा तर खरा संशोधनाचाच एक विषय आहे. सुखी जीवन जगण्याचा प्रत्येक मानवाला हक्क आहे. सुख शोधण्यात किंवा मिळवण्यात काहीच गैर नाही. परंतु ते सुख आपण कोणत्या मार्गाने मिळवतो हे महत्त्वाचे आहे. भौतिक साधनांद्वारे मानवांस जे सुख मिळते ते सुख क्षणभंगुर असते. त्यामध्ये शाश्वतता नसते. आज आहे तर उद्या नाही आशा स्वरूपाचे सुख भौतिक साधनांद्वारे मिळत असते. परंतु आध्यात्माद्वारे मानवांस जे सुख मिळते ते चिरकाल टिकणारे असते. मनाला शांती देणारे सुख असते. मानवी जीवन सफल करणारे सुख आध्यात्माद्वारेच मानवास मिळत असते.

जशी क्रिया तशी प्रतिक्रिया हा निसर्गाचा नियमच आहे. आपण चांगले कार्य केले तर त्याचे फळ आपणास चांगलेच मिळणार आणि आपण वाईट कार्य केले तर त्याचे फळही वाईटच असणार. काही क्रिया आशा असतात की, त्यांचे फळ ताबडतोब मिळते परंतु काही क्रिया आशाही असतात की त्यांचे फळ मिळण्यास काही वर्षे वाट पहावी लागते. पण एक मात्र नक्की की, आपण केलेल्या कार्याचे फळ हे आपणास मिळणारच. मग ते कार्य चांगले असो अथवा वाईट. म्हणूनच, 'भगवानके घर देर है, अंधेर नही है,' असे म्हणतात.

आपले जीवन सुखी, समाधानी आणि शांत राहावे असे वाटत असेल तर आपणास चांगल्या कार्याशिवाय पर्याय नाही. मग आपल्या समोर प्रश्न उभा रहातो, तो म्हणजे आज अनेक व्यक्ती अवैध मार्गाने संपत्ती, सत्ता प्राप्त करूनही त्यांचे जीवन सुखी कसे? आणि आपण एवढे प्रामाणिक काम करूनही आपले जीवन दु:खी कसे? या ठिकाणी आपण एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, जी व्यक्ती अवैध मार्गाने संपत्ती जमा करूनही सुखी असते त्यापाठीमागे त्यांच्या पूर्वजन्मातील चांगल्या कामांचे फळ असते. म्हणून ते सुखी असतात आणि आज चांगले कार्य करणारी व्यक्ती दु:खी असते ते तिच्या पूर्व जन्मातील वाईट कामामुळेच.

आज जन्मलेल्या मुलात अपंगत्व येते किंवा आईच्या गर्भातच अर्भक मृत्यू पावते. त्यापाठी पूर्वजन्मातील वाईट कृत्याचेच फळ असते. म्हणून आपण भविष्यकाळ सुखमय पहायचा असेल तर चांगल्या कार्याशिवाय दुसरा पर्याय नाही. दररोज आपल्या हातून पुण्य होईल असेच कार्य करीत राहावे. आणि असे पुण्य जीवनाच्या खात्यामध्ये जमा केले पाहिजे. जसे आपण बँकेत खाते उघडून त्यात पैसे जमा करीत असतो आणि गरज लागेल त्यावेळी त्यातून काढतो. बँकेत पैसे जमा न करता आपण फक्त काढण्याचेच काम केले तर बँकेत काहीच शिल्लक रहाणार नाही. असेच पुण्यही आपल्या खात्यातून आपण नेहमी खर्च करीत असतो. आपले पुण्याचे खाते रिकामे राहू नये म्हणून आपण त्यात रोज पुण्य जमा केले पाहिजे. अगदी लहान लहान कामांतूनही आपणास पुण्य मिळत असते त्यासाठी काही खर्चही करण्याची गरज नसते. जसे, तहानलेल्या व्यक्तीस

जेव्हा तुम्ही रागावता, तेव्हा बरीच शक्ती वापरली जाऊन वाया जाते.

ग्लासभर पाणी देऊन, संकटातील व्यक्तीची प्रेमाने विचारपूस करून, योग्य तो सल्ला देऊन, प्रवासामध्ये आपण उभे राहून वयस्कर व्यक्तीस बसण्यासाठी जागा देऊन आशा अनेक लहान लहान कार्यातून आपल्या खाती पुण्य जमा करता येते.

आपल्या हातून चांगले कार्य व्हावे असे वाटत असेल तर प्रथम आपण चांगला विचार करायला शिकले पाहिजे. त्यासाठी संगत चांगली असायला हवी. आपण कळत-नकळत रोज अनेक बऱ्या-वाईट गोष्टींचा नेहमी विचार करीत असतो आणि आशा बऱ्या-वाईट गोष्टींच्या सतत विचार करण्यामुळे बहिर्मनाद्वारे अंतर्मनावर त्या गोष्टी वारंवार बिंबवल्या जातात. त्यातूनच आपले मन तयार होत असते. आपण चांगला विचार केला तर आपले मन पवित्र, शुद्ध व शांत बनेल; उलट वाईट विचार केल्यास मनावर वाईटच परिणाम होईल.

'मन' हे चंचल असते ते केव्हाही स्थिर नसते. स्थिर रहाणे हा मनाचा गुणधर्म नाहीच. आपण त्यास कितीही स्थिर ठेवण्याचा किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला तरी ते स्थिर रहात नाही. म्हणूनच तर बहिणाबाई चौधरी यांनी म्हटले आहे की,

मन वढाय वढाय,
उभ्या पिकातलं ढोरं!

किती हाकला हाकला
फिरी येतं पिकावर

आपण कितीही चांगला विचार करण्याचा प्रयत्न केला तरी वाईट विचार आपोआपच मनात येतात. कारण वाईट गोष्टी मन लवकर स्वीकारते. म्हणून मन स्थिर नाही ठेवले तरी चालेल, पण मन स्वच्छ/शुद्ध जरूर ठेवा. आशा वाईट विचारांपासून दूर रहायचे असेल, आपले मन पवित्र राहवायचे असेल तर जीवनात 'सद्गुरू' असणे गरजेचे आहे. सद् म्हणजे सत्य आणि गुरू म्हणजे मार्गदर्शक. मनात येणाऱ्या वाईट विचारांपासून आपणास सद्गुरूच वाचवू शकतात. आपण आपले शरीर स्वच्छ करण्यासाठी दररोज अनेक सुगंधी साधनांचा वापर करतो. तसेच मन, स्वच्छ, ताजे, टवटवीत ठेवण्यासाठी सद्गुरूंच्या अनेक उपदेशांची आवश्यकता आहे. सद्गुरू हे माणूस आणि परमेश्वर यांना जोडण्याचे कार्य करतात. भौतिक साधनांच्या मागे न लागता साधनेच्या मागे कसे लागावे हे शिकवतात. साधनेद्वाराच मानवास खरी शांती मिळते. अशी शांती साधनांच्या उपभोगापासून मिळत नाही. परमेश्वर प्राप्त करून घ्यायचा असेल, परमेश्वराच्या सान्निध्यात राहायचे असेल तर सद्गुरू शिवाय दुसरा पर्याय नाही.

आपल्या मनात दुसऱ्याबद्दल नेहमी दया जागृत व्हायला हवी. दुसऱ्याच्या पायाला ठेच लागल्यानंतर त्या व्यक्तीस जशा वेदना होतात, तशाच वेदना त्या व्यक्तीस लागलेली ठेच पाहून आपल्या मनाला व्हायला हवी. त्यावेळी आपण परमेश्वर प्राप्तीच्या मार्गावर चालत आहोत हे समजायला हरकत नाही. म्हणून प.पू. सद्गुरू सुधांशूजी महाराज या ठिकाणी 'दया' या शब्दाचा वापर पुढील प्रमाणे करतात -

जो दुसरोंके उपर दया करेगा,
उसकी याद भगवान करेगा।
और, जो भगवानकी याद करेगा,
भगवान उसपे दया करेगा॥

म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या मनात दया निर्माण व्हायला हवी, प्रेम असायला हवे आणि करुणाही असायला हवी. ''आपल्या दरवाजात आलेल्या भिकाऱ्याला कमी लेखू नका, त्याची निंदा करू नका, त्यास सन्मानाने वागवा आणि त्याला केव्हाही खाली हाताने परत पाठवू नका. कारण तो भिकारी परमेश्वराकडून एक संदेश घेऊन तुमच्यापर्यंत आलेला असतो. तो संदेश म्हणजे ''मला खाली हाताने परत पाठवू नका, पूर्वीच्या जन्मी मी दरवाजातील भिकाऱ्याला नेहमी खाली हाताने पाठवत

असेन. म्हणून या जन्मी परमेश्वराने माझ्या हातात कटोरा दिला आहे. या कटोऱ्याची जागा बदलण्यास परमेश्वरास वेळ लागत नाही. पुढच्या जन्मी कदाचित तो कटोरा तुमच्या हाती असेल.'' म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपल्या कुवतीनुसार दान केले पाहिजे. परंतु दान हे नि:स्वार्थ भावनेतून केले पाहिजे. आज आपण अनेक ठिकाणी वाचतो, पहातो आणि ऐकतो की, अमूक व्यक्तीने तमूक देवाला लाखो रूपयांचे दान दिले. दानधर्म करणे केव्हाही चांगले. प्रत्येक व्यक्तीने कुवतीनुसार दानधर्म जरूर करावा त्यातून पुण्यप्राप्तीचा आनंद मिळतो. परंतु जे साधन (वस्तू/पैसा) आपण दान करणार आहोत ते साधन कोणत्या मार्गाने आपण मिळवले आहे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. दान म्हणून देण्यात येणारे साधन अवैध मार्गाने/साममार्गाने मिळवले असेल तर अशा दानधर्मापासून फक्त समाधान मिळेल. मी अमूक देवाला लाखो रूपये दान दिले, याचे समाधान प्राप्त होईल. परंतु असे दानधर्म केल्याने पुण्य मात्र नक्कीच मिळणार नाही. आपल्या कष्टांतील कमाईमधील १% दान केले तर त्याचे पुण्य मिळेल. परंतु अवैधमार्गातील लाखो रुपयाचे दान दिल्याने पुण्य मिळणार नाही.

आज अनेक व्यक्तींकडे लाखो, करोडे, अब्जावधी रूपयांची मालमत्ता आहे पण त्या मालमत्तेचा उपभोग घेण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नाही, त्यांना सवड नाही. अशी मालमत्ता असून काय उपयोग? तिचा आपणास उपभोग घेता येत नसेल तर उपयोग काय? म्हणून सद्गुरू मोरारी बापू सांगतात, आपणास आवश्यक तेवढीच साधनसंपत्ती जमा करावी, बाकीची संपत्ती ज्यांना गरज असेल त्यांना उपभोग घेऊ द्यावा. अथवा जास्तीची संपत्ती गरीब, अनाथ व्यक्तींना दान करावी. बँकेत करोडो रुपये आहेत परंतु, त्यांचा आपणास उपभोग घेता येत नाही. मृत्यूनंतर ही संपत्ती आपणास येथेच सोडून द्यावी लागते. पण तीच संपत्ती आपण गरजूंना दान दिली तर आशा दानाचे पुण्य मात्र आपणास पुढील जन्मी मिळते. हीच खरी आपल्या आयुष्यातील गुंतवणूक असते.

आपण मिळवलेले धन, दौलत, पैसा कोणत्या मार्गांनी कमावला. हे तपासण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे 'ज्या-ज्या वेळेस आपण जेवण करतो त्या-त्या वेळेस अगोदर दोन मिनिटे शांत बसून विचार केला पाहिजे की, हे अन्न मी कोणत्या मार्गाने कमावले आहे, त्यासाठी कोणकोणती कामे केली आहेत, जर ते अन्न दुसऱ्यास लुबाडून, चोरी करून, मारामाऱ्या करून मिळवले असेल तर ते अन्न आपल्या पचनी पडणार नाही. उलट्या, जुलाब होऊन प्रकृती खालावेल. प्रत्येक व्यक्तीने योग्य आणि चांगल्या मार्गनेच धन कमावले पाहिजे. म्हणून सद्गुरू वामनराव पै सांगतात, 'जे काही मिळवायचे असेल ते चांगल्या मार्गाने मिळवायचे की अवैध मार्गाने मिळवायचे, हे तू ठरवायचे आहेस. कारण, तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार.'

**श्री. यशवंत माने**
ग्रंथालय विभाग,
रुपारेल महाविद्यालय,
माटुंगा, मुंबई - ४०००१६.

●●●

## अजब कहाण्या शोधांच्या

### *इलेक्ट्रिक रेझर*

रिव्हॉल्विंग कटिंग हेडच्या तत्त्वावर चालणाऱ्या व ग्रिडमार्फत केस कापणाऱ्या इलेक्ट्रिक रेझरची पेटंटस अमेरिकेत १९०० पासून अनेकांनी घेतली. परंतु, त्यामुळे दाढी होताना त्वचेतून केस उपटले जाऊन दुखापत होत असल्याने, लोक त्यांचा वापर टाळत. १९२८ मध्ये जेकब स्किचने बनवलेल्या इलेक्ट्रिक रेझरमध्ये मात्र प्रगत तंत्र वापरले गेले. त्यामुळे त्यांचा वापर जास्त सहजपणे होऊ लागला.

# परिसरवार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

**पूर्व प्राथमिकच्या मुलांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा :**

नवीन वर्षाची सुरूवात गुरुवार दि. १९ जून पासून झाली. हल्ली मुले बालवाडीत जात असल्यामुळे त्यांना शाळेची सवय होते; म्हणून मुले शाळेच्या पहिल्या दिवशी रडली नाहीत व आनंदाने शाळेत हजर झाली. मुलांना गोळ्या देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

ह्यावर्षीपासून गटांची नांवे बदलण्यात आली. प्रत्येक गटाला फळाचे नाव देण्यात आले. (आंबा, डाळिंब, पपई, अननस व सफरचंद.)

आपल्या हिंदू सणांची सुरुवात आषाढी एकादशीच्या बालपंढरी दिंडीने झाली. वारकरी वेषात हे छोटे वारकरी दिंडीत सामील झाले. टाळांच्या गजरात व विठ्ठलाच्या नामघोषात तल्लीन होऊन, नाचत पंढरपूरच्या विठ्ठल-माऊलीला भेटण्यास आतुर झाले होते.

''विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला----'' ह्या भजनात तल्लीन होऊन नाचत नाचत त्यांची विठ्ठल-रखुमाईशी भेट झाली, त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

सर्व शिक्षक, सेविका व पालकांचे मौलिक सहकार्य आणि मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे बालपंढरी दिंडी अतिशय सुंदर झाली. शेवटी रिंगण व फुगड्या घालून दिंडीची सांगता करण्यात आली.

**गुरुपौर्णिमा :**

व्यासपौर्णिमा म्हणजेच गुरूपौर्णिमा. गुरूंचे आशीर्वाद घेण्याचा खास दिवस.



**पूर्व प्राथमिक शाळेतील छोटे वारकरी**

लहान व मोठ्या शिशुच्या प्रत्येक वर्गातून एक जोडी याप्रमाणे गुरू-शिष्यांच्या जोड्या तयार करण्यात आल्या होत्या. (द्रोणाचार्य-एकलव्य, रामदास स्वामी-शिवाजी, निवृत्तीनाथ-ज्ञानेश्वर, सांदिपनी-श्रीकृष्ण, धौम्य ऋषी-अरूणी.)

मुलांच्या समोर गुरू-शिष्याची जोडी बसवून गुरू-शिष्यांची गोष्ट सांगण्यात आली. अशा प्रकारे पूर्व प्राथमिक विभागात दि. १८ जुलै रोजी गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

**'दिशा' मासिकासाठी गौरवक्षण :**

✦ 'राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २००८' या अनुषंगाने 'जिज्ञासा ट्रस्ट ठाणे' यांचे तर्फे शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित कार्यशाळेस इ. ७ वी व ८ वी तील निवडक विद्यार्थी व सौ. उज्ज्वला धोत्रे उपस्थित होत्या.

✦ दि. ४ जुलै रोजी इ. ५ वी च्या वर्गांच्या पालक सभेस वर्षभर होणाऱ्या लेखी व तोंडी परीक्षा तसेच गुणविभागणी, शाळेचे नियम, स्पर्धा परीक्षा, शिस्त व

मुलांचा अभ्यास इ. संदर्भातील माहिती पालकांना दिली. मान. मुख्याध्यापिका व उपमुख्याधापिका यांनी सर्व वर्गांना भेट देऊन शाळेच्या नियमावलीची माहिती दिली.

✦ इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी IPH या संस्थेमार्फत दि. २८ जुलै' ०८ रोजी 'मनोविकास' कार्यक्रम आयोजित केला. मनोविकासाच्या सौ. वर्षा ढगे, श्री. बोऱ्हाडे यांनी नाट्यछटांमधून सकारात्मक व नकारात्मक दृष्टीकोनाचे वर्तणुकींवर होणारे परिणाम दाखविले. तसेच मन हे हृदयात नसून मेंदूच्या पेशीत आहे. काय हवंय हे जाणून, निश्चित करून त्याप्रमाणे वागणूक ठेवावी हे पटवून दिले.

✦ 'शिक्षण स्फूर्ती-पुणे' या संस्थेने दि. ५ जुलै' रोजी 'Total Quality Management of the schools and Latest Trends in Education' या विषयावर संस्थेचे अध्यक्ष श्री. जयप्रकाश सोमानी यांनी व्याख्यान दिले. व्याख्यानास श्री. शशांक भोईर उपस्थित होते.

✦ 'ज्ञान विज्ञान प्रतिभा परीक्षा - पुणे' २००७-०८ या वर्षी झालेल्या परीक्षेत ३७ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थी यशस्वी झाले. यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| प्रणिता काळभोर | हेमेश सावकार | अनिकेत पाटील |
| ऐश्वर्या राणे | आकांक्षा माने | विक्रांत देवधरे |
| तनिषा देसाई | सिद्धी मोरे | श्रीहरी मुळगुंद |
| ऐश्वर्या पेडणेकर | ओमकार सावंत | सायली येनभर |
| वैशाली बच्छाव | कुणाल क्षीरसागर | |

✦ इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना 'जिंकी रे जिंकी' चित्रपट दाखविण्यात आला.

✦ '१२ जुलै' ०८ रोजी शिक्षक-पालक संघाची स्थापना झाली. या सभेस सर्व शिक्षक तसेच सर्व वर्गांचे पालक प्रतिनिधी उपस्थित झाले. उपस्थित पालक प्रतिनिधींपैकी खालील पालकांची पालक प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

| | |
|---|---|
| श्री. सुभाष दिगंबर ठोंबरे | श्री. रमेश विष्णु नेने |
| सौ. प्रतिभा सुधीर नातू | सौ. छाया पाचारणे |

या संघ स्थापनेस ज्ञानसाधना कॉलेजचे प्राध्यापक श्री. दत्तात्रय चितळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

✦ १८ जुलै रोजी झालेल्या 'गुरुपौर्णिमा' कार्यक्रमात इ. ५ वी साठी श्री. धोंडे, इ. ६ वी साठी श्रीमती आशा जोशी, इ. ७ वी साठी श्री. धोंडे, सौ. चौबळ, इ. ९ वी साठी श्री. सुहास जावडेकर, इ. १० वी साठी सिंधुताई सपकाळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. इ. ८ वी साठी आगळा वेगळा असा कीर्तनाचा कार्यक्रम श्री. राजेंद्र पाटणकर आणि श्री. मकरंद जोशी यांनी सादर केला.

✦ इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या गुरूपौर्णिमा कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ उपस्थित होत्या. त्यांनी गुरूबरोबर आईलाही मान द्यावा कारण तीच दुःख पचवते, झेलते आणि तुम्हाला वाढवते असे सांगितले. इ. १० वी च्या विद्यार्थ्यांनी सिंधुताईंच्या कार्यासाठी निधी गोळा केला. डॉ. दफ्तरदार यांनी रु. ५००१ ची देणगी जाहीर केली. माननीय मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी त्यांच्या कार्यात सामील होण्याचे आश्वासन दिले.

✦ ११ जुलै' ०८ रोजी मो.ह. विद्यालय येथे 'सन्मित्र' दैनिकाचे संस्थापक कै. स. पां. जोशी यांनी सुरु केलेल्या मंडळाने मराठी मायबोली अभिनव संस्कार, शब्दभ्रम, शब्दखेळ, शब्दसंग्रह असे कार्यक्रम केले. सदर कार्यक्रमास सौ. शिंगाडे उपस्थित होत्या.

✦ १२ जुलै रोजी पवार पब्लिक स्कूल यांच्या विद्यमाने 'आजची मुले : शिक्षण' मुलांच्या वैयक्तिक, सामाजिक समस्या विषयाची कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यक्रमासाठी सौ. बोऱ्हाडे व सौ. धनगर उपस्थित होत्या.

✦ 'प्रॉक्टर अॅन्ड गॅम्बल' कंपनीतर्फे इ. ७ वी व ८ वी

च्या विद्यार्थीनीना त्यांच्या वयात येताना या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

✦ गुरूपोर्णिमेनिमित्त स्टुडंटस् फ्युचर असोशिएशन तर्फे मान. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांना 'भगवद्‌गीता' देण्यात आली. तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख श्री. राजेश मोरे यांच्यातर्फे फुलांचा गुच्छही मान. मुख्याध्यापिका यांना देण्यात आला.

✦ लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त दि. २८ जुलै' ०८ रोजी झालेल्या हस्ताक्षर स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| इ. ५ वी | उत्तरा भरत अहिरे | ५ ब |
| इ. ६ वी | अक्षया ज. पाटील | ६ ब |
| इ. ७ वी | हर्षदा बा. नेवाळकर | ७ ब |
| इ. ८ वी | प्रियांका सं. पेडणेकर | ८ अ |
| इ. ९ वी | मनाली प्र. निमसे | ९ अ |
| इ. १० वी | श्रद्धा र. पाटील | १० ड |

✦ लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त ३० जुलै रोजी घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| इ. ५ वी | मालविका विनोद रासम | प्रथम |
| इ. ६ वी (अ) | प्रणिता हनुमंत काळभोर | प्रथम |
| (ड) | स्नेहल सखाराम पाटील | द्वितीय |
| (क) | अक्षय युवराज मोहिते | उत्तेजनार्थ |
| इ. ७ वी (अ) | मृदुला गणेश शेटे | प्रथम |
| (ब) | श्रीहरि पुरूषोत्तम मुळगुंद | द्वितीय |
| (ड) | आकांक्षा बबन माने | उत्तेजनार्थ |
| इ. ८ वी (अ) | तनिषा पांडुरंग देसाई | |
| इ. ९ वी (अ) | प्रियांका एकनाथ गुरव | |
| इ.१०वी (अ) | देविका संजय तासगावकर | |

✦ मार्च २००८ च्या शालान्त परीक्षेत इ. १० वी ड मधील कानगुडे विद्‌या मदन या विद्यार्थीनीला शालांत परीक्षेच्या गुणात पुन्हा पडताळणी करतांना गणित विषयात ३५ ऐवजी ५२ गुण जाहीर झाल्याने ती उत्तीर्ण झाली. त्यामुळे आता शाळेचा निकाल ९७% झाला.

✦ श्वेता अशोक जाधव हिला शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात १०० पैकी ९४ गुण मिळाले. विशेष म्हणजे ठाणे महानगरपालिका हद्दीतून श्वेताला सर्वाधिक गुण मिळाले आहेत. त्याबद्दल ठाणे महानगरपालिकेने रोख रु.२००/- आणि गौरवचिन्ह देऊन तिचा सत्कार केला.

✦ 'फोर कोडस् इंडिया' ही संस्था आदिवासी विभागातील लोकांची नेत्रचिकित्सा, अनाथ व निराधारांना मदत, मंदबुद्धी मुलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करते. यंदा या संस्थेच्या मदतीसाठी इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांनी रु. १३८०/- निधी संकलित केला.

✦ 'बालमित्र' प्रबोधिनीसाठी १२४ विद्यार्थी सभासद झाले.

✦ 'मॅकमिलन' या शैक्षणिक संस्थेतर्फे 'मराठी शालेय ॲटलास' प्रकाशित होत आहे. त्यासाठी इ. ५ वी ते १० च्या भूगोल शिक्षकांनी एक प्रश्नावली सोडवली.

✦ इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'संस्कृत भाषा परिचय' म्हणून सुरवाणी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नांदेडकर यांनी वर्ग घेतला.

✦ 'ऑल इंडिया कॅमल कलर स्पर्धा' २ ऑगस्ट' ०८ रोजी इ. ५ वी ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. त्यासाठी विषय होते,

| | | |
|---|---|---|
| इ. ५ वी ते ७ वी | - | आपली संस्कृती |
| इ. ८ वी ते १० वी | - | २०२० सालातील भारत |

✦ १ ऑगस्ट रोजी सरस्वती सेकंडरी स्कूल, नौपाडा येथे बालविज्ञान चळवळीच्या २००८-०९ शैक्षणिक वर्षाच्या उद्‌घाटन समारंभात प्रमुख वक्ते ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शंकरराव गोवारीकर यांनी विद्यार्थ्यांना अणुउर्जेसंबंधी

माहिती दिली तसेच त्यांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमास इ. ९ वीतील २० विज्ञानप्रेमी विद्यार्थी व विज्ञान शिक्षिका सौ. वंदना अडसुळे उपस्थित होत्या.

✦ लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त प्रमुख पाहुण्या मान. सौ. नंदिनी अविनाश बर्वे यांना आमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमास मान. मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका तसेच इ. ९ वी चे शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. इ. १० वी तील कौस्तुभ बांबरकर, वेदाक्ष जोशी, प्रसाद तिरोडकर या विद्यार्थ्यांनी टिळकांच्या स्वदेशी चळवळीवर जोशपूर्ण पोवाडा सादर केला. लो. टिळाकांचे बालपण, टिळकांचे मंडालेतील दिवस, टिळकांची पत्रकारिता या विषयांवर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. तसेच प्रमुख पाहुण्यांनी अतिशय उत्कंठावर्धक भाषण केले.

## आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा (प्रा.वि.)

✦ **कुमारी वैश्णवी देसाई हिने पोहण्याच्या राज्य व जिल्हा स्तरीय स्पर्धांमध्ये मिळवलेले प्रावीण्य पुढीलप्रमाणे :**

१) बॉम्बे जिमखाना आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहावा क्रमांक (५० मी. ब्रेस्ट स्ट्रोक)

२) जिल्हास्तरीय ॲकवॅटिक चॅम्पियनशीप २००८ स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक (४ x ५० मी. फ्री स्टाईल रिले)

३) सी.के.पी. क्लब ॲकवॅटिक मीट जिल्हास्तरीय स्पर्धेत दुसरा क्रमांक (४ x ५० मी. फ्री स्टाईल रिले)

✦ **नवी मुंबई स्पोर्टस् असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या बावीसाव्या ठाणे जिल्हास्तरीय बॅडमिंटन चॅम्पियनशीप २००८ स्पर्धेत लहान मुलांच्या गटात एकेरी विभागात कुमार नील अनप विजेता झालेला आहे.**

## सौ.ए.के.जोशी इंग्रजी माध्यम शाळा (मा.वि.)

**दि. २७ जुलै ०८ रोजी झालेल्या ब्राह्मण सभा, ठाणे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली :**

| | | |
|---|---|---|
| १) अमित पाटणकर | - | प्रथम |
| २) ऐश्वर्या देवस्थळी | - | उत्तेजनार्थ |
| ३) अपूर्वा देशपांडे | - | उत्तेजनार्थ |

**सौ. ए. के. जोशी विद्यालयाचे विद्यार्थी पुन्हा एकदा चीन दौऱ्यावर :**

गतवर्षीप्रमाणे याही वर्षी चीन सरकारकडून ठाण्यातील 'प्राच्य विद्या अभ्यास संस्थेला' तेथील राष्ट्रीय स्तरावरील 23rd China Adolescent Science and Technology Innovation Contest (CASTIC) मध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण मिळाले होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर हे डॉ. सुधाकर आगरकर (होमी भाभा विज्ञान केंद्र), सौ. ए. के. जोशी विद्यालयाचे कृणाल चौधरी, अमोघ वैद्य, सिद्धार्थ नायर हे तीन विद्यार्थी व शिक्षिका सौ. शर्मिला नायर यांच्यासह २७ जुलै रोजी चीनला रवाना झाले.



२९ जुलै ते ४ ऑगस्ट या दरम्यान चीनमधील

क्सीनजिअँग येथील उर्मुकी या ठिकाणी होणाऱ्या २३ व्या CASTIC मध्ये शाळेचे विद्यार्थी 'स्वयंपाकघरातील पाण्याचा पुनर्वापर' या विषयावरील आपला प्रकल्प सादर केला. गेल्या वर्षी या प्रदर्शनातील 'हायड्रोपोनिक्स' या प्रकल्पाला शाळेतील विद्यार्थ्यांना 'विशेष गौरव' प्राप्त झाला होता. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी या विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

**दिशा व्यासपीठ :**

'दिशा व्यासपीठ' उपक्रमाअंतर्गत २००८-०९ या शैक्षणिक वर्षातील पहिला कार्यक्रम 'काव्यसूर' शनिवार दि. १९ जुलै २००८ रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत विद्या प्रसारक मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात मान्यवर कवींच्या कविता, संगीत व साहित्यातील सांस्कृतिक छटा सादर केल्या गेल्या.

**विज्ञानाला भारतीयांचे योगदान :**

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष व प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे 'औद्योगिक क्रांतिपूर्व काळातील भारतीयांचे विज्ञानाला योगदान' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दि. १३ जुलै रोजी झाले. थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या सदर व्याख्यानात डॉ. बेडेकर यांनी भारतीय शास्त्रज्ञांचे संशोधन कसे मूलभूत होते यासंबंधी माहिती दिली. प्राच्य विद्या अभ्यास संस्थेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. सुधाकर आगरकर यांनी भूषवले होते.

•••

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे**

## 'दिशा व्यासपीठ'

'दिशा व्यासपीठ' विद्या प्रसारक मंडळाचे शिक्षणक्षेत्रासाठी आणखी एक पुढचे पाऊल.

आजची तरुण पिढी म्हणजे देशाचा/राष्ट्राचा पाया आणि त्यांना देण्यात येण्याऱ्या शिक्षणापासून होणारा राष्ट्राचा विकास. अन राष्ट्राचा विकास मग तो कोणत्याही राष्ट्राचा असो त्यासाठी सुशिक्षित तरुणांचा विकास महत्त्वाचा असतो. शाळा, महाविद्यालय व विविध शिक्षण क्षेत्रातुन मिळणाऱ्या शिक्षणाचा मूळ उद्देश हा प्रत्येक व्यक्ती सुशिक्षित बनविण्यासाठी व त्याचा व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी असतो. जॉन हॉप्कीन्स विद्यापीठाचे अध्यक्ष स्टोव्हन म्यूलर यांच्या मते सध्याची विद्यापीठे अतिकुशल, अतिहुशार तरूणांची पिढी निर्माण करीत आहे. पण सुस्कृत जीवनमूल्यांचे मोल काय आहे हे त्यांचेपुढे ठेवले गेलेले नाही. त्यामुळे अशावेळी ते दिशा व्यासपीठासारख्या आधाराचा अधिकाधिक शोध घेत असतात.

अशा सर्व गोष्टींचा विचार करूनच विद्या प्रसारक मंडळाने विविध उपक्रम व विविध अभ्यासक्रमांसोबत 'दिशा व्यासपीठ' स्थापन केले आहे. मंडळातर्फे मुद्रित स्वरूपात दिशा मासिक काढले जाते. ज्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे/व्यक्तींचें व्यक्तीमत्व विकास घडवून ती व्यक्ती प्रगल्भ, जबाबदार व सुसंस्कृत नागरिक बनविण्याचा प्रयत्न केला जातो. 'दिशा व्यासपीठ' प्रत्येक महिन्याला या संबंधीचे अभ्यासपूर्ण भाषणे, नृत्य, संगीत, काव्य इ. कार्यक्रम आयोजित करणार आहे. त्यामार्फत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना नविन व्यासपीठ मिळणार आहे.

मुख्यपृष्ठावरून
संपादकीय

**... तर तो सुदिन ठरेल !!**

मूलभूत अधिकार, धर्म व विज्ञान, धर्म व तंत्रज्ञान, पर्यावरण, भाषा या सर्वांसह मानवी जीवनामधील सर्वच क्षेत्रांचे अपरिमित नुकसान होत आहे.

वर्षानुवर्षे आपण साजरे करत असलेले सण, समारंभ त्यामध्ये शिरलेल्या विकृत, चुकीच्या प्रवृत्ती, साजरे करण्यातील वाढते प्रदूषण हे सर्व पावलोपावली जाणवत आहे. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन असे राष्ट्रीय स्तरावरील महत्त्व असणारे दिवस असोत की वैयक्तिक वाढदिवस असो, सर्वत्र वेगाने मूल्यांचा ऱ्हास होताना दिसतो आहे. 'खाओ पिओ, ऐश करो' हा भोगवादाचा संदेश रात्र न् दिवस समाजातल्या प्रत्येक घटकांपर्यंत सातत्याने झिरपत असतो. त्यामुळे स्वतंत्र देशांचे स्वतंत्र नागरिक पारतंत्र्याकडे नेणारे चंगळवादाचे रस्ते अहोरात्र चालत आहेत. स्वातंत्र्याबरोबर आपातत: आलेल्या जबाबदारीचे भान, स्वातंत्र्याचे संदर्भ ठिसूळ बनायला लागले आहेत.

या सर्वांवर उपाय काय? मूठभरांनी काळजी करून, हातपाय बांधून बसल्याने किंवा अश्रू ढाळल्याने काय होणार? शिक्षण हा मूलभूत अधिकार आहे असे आपण मान्य करतो. त्याच पाठोपाठ देशात अमूक एक टक्के लोक साक्षर आहेत याची आकडेवारीही आपण पुरवतो. स्वातंत्र्योत्तर पाच तपांत आपण किती प्रगती केली, हे सूचित करण्यासाठी हे आकड्यांचे तुणतुणे वाजवले जातो. अमूक एक टक्के साक्षर लोक आहेत, याचा व्यत्यास अमूक एक टक्के अजूनही निरक्षर आहेत, त्यांना शिक्षणाच्या अधिकारापासून आम्ही वंचित ठेवले आहे असा होतो. सर्वशिक्षा मोहिमेसारख्या मोहिमांचे आकडे कागदांच्या धावपट्टीवर पळत राहतात. शिक्षणासंबंधीच्या गुणवत्ता वाढीसाठी राबवले जाणारे उपक्रम प्रभावी होत नाहीत आणि पश्चिमेकडील लोकांच्या चुकीच्या विचारांची, जीवन पद्धतीची भलावण थांबत नाही तोवर क्षितिजावर उत्तरे उगवताना दिसणार नाहीत.

माणूस हा देव आणि राक्षस यांचा विचित्र संकर आहे. म्हणजेच सत्प्रवृत्ती बरोबरच असत्प्रवृत्तीची माणसेही समाजात असतात. तशी ती राहतीलही. पण राक्षस वृत्तीच वाढत राहिल्याचे दिसते. तेव्हा समाज विघटनाकडे वाटचाल करायला लागतो; या वृत्तीचे प्रमाण किमान करायचे असेल तर, प्रत्येकानेच आरशात पहायला हवे, विनोबा भावेंच्या शब्दांत सांगायचे तर 'स्व-रूप' पहायला हवे. आरशात दिसणारी प्रतिमा गडद काळी वाटत असेल तर वेळीच सावरायाला हवे. देशाचे भविष्य घडवणे, देश स्वतंत्र ठेवणे हे अशा मलिन प्रतिमा असणाऱ्या नागरिकांचे काम नाही!


समाजामधील प्रत्येकाला, अगदी शेवटच्या घटकालाही आपल्यातील 'माणूसपण' गवसेल, नागरिकत्वाच्या जबाबदारीची जाणीव होईल, तो दिवस प्रत्येकाच्या आयुष्यात आणि देशाच्याही आयुष्यात सुदिनच ठरेल!!

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

वा.मो.बेडेकर

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

☆ *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*

☆ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*

☆ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नांव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा.ना.बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**☆ संपर्क ☆**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.